दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची
सोमवार, दि. २० जुलै २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २०५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# पावसाळी अधिवेशनापूर्वी सर्वपक्षीय बैठक

## विरोधी पक्षाचे खासदार १५ मिनिटांत बाहेर पडले, नंतर पुन्हा आले; बंडखोर खासदारांना बैठकीत येण्यास विरोध

मुंबई (दै. संध्या)



मान्सून अधिवेशनाच्या एक दिवस आधी सरकारने रविवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली. बैठक सकाळी 11 वाजता संसद भवन अॅनेक्सीमध्ये झाली. बैठकीत काँग्रेस, सपा, टीएमसी, द्रमुक (DMK) सह अनेक विरोधी पक्षांचे नेते सहभागी झाले होते. मात्र 15 मिनिटांनंतर विरोधी खासदार बाहेर पडले आणि त्यांनी बैठकीतून सभात्याग केला.

विरोधी खासदारांचा आरोप आहे की, सरकारने टीएमसीच्या बंडखोर 20 खासदारांच्या गटाला बैठकीत का बोलावले? तर, अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांच्या गटाला अद्याप मान्यता दिलेली नाही. मात्र, सभात्याग प्रतिकात्मक होता, विरोधी खासदार पुन्हा बैठकीत सहभागी झाले. दुसरीकडे, संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी सर्व राजकीय पक्षांना संसदेचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले - संसद सर्वांची आहे, गोंधळामुळे कोणाचाही फायदा नाही. संसदेचे मान्सून अधिवेशन 20 जुलैपासून सुरू होऊन 13 ऑगस्टपर्यंत चालेल. या काळात 19 बैठका होतील. टीएमसी खासदार महुआ मोइत्रा म्हणाल्या की, काँग्रेस, समाजवादी पक्ष, डीएमके, जेएमएम, आम आदमी पक्ष, नॅशनल कॉन्फरन्स, डावे पक्ष आणि शिवसेना (यूबीटी) यासह संपूर्ण विरोधी पक्षाने सर्वपक्षीय बैठकीवर बहिष्कार टाकला आहे. त्या म्हणाल्या की, टेबल ऑफिसच्या यादीत अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस (TMC) ची सदस्य संख्या 28 दाखवण्यात आली आहे, तर एनसीपीआय (NCPI) नावाच्या एका गैर-मान्यताप्राप्त पक्षाच्या 20 बंडखोर खासदारांच्या विलीनीकरणाला अध्यक्षांनी मंजुरी दिलेली नाही आणि त्यांच्या अपात्रतेच्या याचिका अजूनही प्रलंबित आहेत. महुआ यांनी प्रश्न विचारला की, 91व्या दुरुस्तीनंतर जेव्हा कोणत्याही वेगळ्या गटाला वावच नाही, तर संसदीय कार्यमंत्र्यांनी या 20 बंडखोर खासदारांना कोणत्या आधारावर निमंत्रण दिले? याच विरोधात संपूर्ण विरोधी पक्षाने बैठकीवर बहिष्कार टाकला आहे. ममता बॅनर्जींची साथ सोडणाऱ्या TMC च्या 20 बंडखोर खासदारांना शनिवारी लोकसभेत स्वतंत्र बसण्याची परवानगी मिळाली होती. 15 जून रोजी तृणमूल काँग्रेसच्या 20 खासदारांनी नॅशनलिस्ट सिटीझन्स पार्टी ऑफ इंडिया (NCPI) मध्ये विलीन झाले होते. तिकडे लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी उद्धव गटातील 6 बंडखोर खासदारांनाही मान्यता दिली आहे. 22 जून रोजी उद्धव यांची साथ सोडून 6 खासदार शिंदे गटात सामील झाले होते. हे खासदारही आता शिंदे गटासोबत संसदेत बसतील. महाराष्ट्रामध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत 22 जून रोजी पुन्हा बंडखोरी झाली होती. लोकसभेतील एकूण 9 पैकी 6 खासदार पक्षातून वेगळे होऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सामील झाले होते. लोकसभेत आता शिंदे यांच्या खासदारांची संख्या 7 वरून वाढून 13 झाली आहे. शिंदे यांच्यासोबत सर्व 6 खासदारांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन याची घोषणा केली होती. उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले, 'जेव्हा 2022 मध्ये आम्ही पक्ष आणि धनुष्यबाण वाचवण्यासाठी बंड केले होते, तेव्हा 40 आमदार होते आणि आता आम्ही षटकार मारला आहे.'

## मुंबई हायकोर्टाच्या दणक्यानंतर शिंदे गटाचे नगरसेवक रमेश म्हात्रे पोलिसांना शरण

मुंबई (दै. संध्या)




कल्याण - डोंबिवली महानगर पालिकेच्या रुग्णालयात एका महिला डॉक्टरला मारहाण केल्याप्रकरणी एक मोठी आणि महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी अखेर आज पोलिसांसमोर शरणागती पत्करली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या कडक इशाऱ्यानंतर म्हात्रे यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात स्वतःहून हजेरी लावत आत्मसमर्पण केले. डॉक्टर मारहाण प्रकरणात रमेश म्हात्रे यांना कल्याणच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने १४ जुलै रोजी जामीन मंजूर केला होता. मुंबई उच्च न्यायालयाने आरोपी रमेश म्हात्रे यांच्यावर अत्यंत कडक शब्दांत ताशेरे ओढत, कल्याणच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने मंजूर केलेला जामीन तडकाफडकी स्थगित करत, त्यांना पोलिसांसमोर आत्मसमर्पण करण्यासाठी आज, रविवार संध्याकाळी ५ वाजेपर्यंतची अंतिम मुदत दिली होती. तसेच जर म्हात्रे दिलेल्या मुदतीत विष्णूनगर पोलिसांना शरण आले नाहीत, तर त्यांच्या सर्व स्थावर मालमत्तांवर टाच जप्तीची कायदेशीर प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे आदेश हायकोर्टाने दिले होते. मुंबई हायकोर्टाच्या या दणक्यानंतर म्हात्रे यांच्याकडे दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहिला नव्हता. मालमत्ता जप्त होण्याच्या कायदेशीर कारवाईची टांगती तलवार असल्याने, रमेश म्हात्रे यांनी आज ठरवून दिलेल्या वेळेच्या आत कल्याणमधील विष्णुनगर पोलीस ठाणे गाठले आणि ते पोलिसांना शरण आले. आता पोलीस त्यांची अधिकृत अटकेची नोंद करून त्यांची वैद्यकीय तपासणी करतील आणि त्यांना पुढील प्रक्रियेसाठी न्यायालयात हजर करतील.

## राज्यात पावसाची पुन्हा दमदार हजेरी

### मुंबई, ठाणे, पालघरसह कोकणात मुसळधार

मुंबई (दै. संध्या)



गेले काही दिवस दडी मारून बसलेल्या पावसाने राज्यात पुन्हा एकदा जोरदार पुनरागमन केले आहे. मागील दोन-तीन दिवसांपासून विशेषतः कोकण किनारपट्टी आणि लगतच्या भागांत पावसाचा जोर वाढला असून, अनेक ठिकाणी हलक्या ते मुसळधार सरी कोसळत आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, रविवारी मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड या जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. पालघर जिल्ह्यात तर विजांच्या कडकडाटासह आणि मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा थेट परिणाम राज्याच्या हवामानावर दिसून येत आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी हा कमी दाबाचा पट्टा काहीसा कमकुवत झाला असला तरी, वातावरणात चक्राकार वाऱ्यांची स्थिती अद्याप कायम असल्याने पावसाचा जोर टिकून आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात उत्तर कोकण आणि मुंबईत अतिमुसळधार पावसाने दाणादाण उडवली होती, ज्यामुळे अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली होती. मात्र, त्यानंतर पावसाने अचानक मोठी विश्रांती घेतली. यामुळे उकाडा वाढला आणि पावसाअभावी शेतीची कामेही रखडली होती. आता पावसाने पुन्हा हजेरी लावल्यामुळे बळीराजाला मोठा दिलासा मिळाला असून, खोळंबलेल्या शेतीकामांना वेग आला आहे. शनिवारी रात्रीपासूनच मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये पावसाने दमदार हजेरी लावली आहे. दादर, वांद्रे, अंधेरी, विलेपार्ले आणि मध्य उपनगरांमध्ये शनिवारी रात्री चांगला पाऊस झाला. रविवारी सकाळपासूनच शहरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळत आहेत. हवामान अभ्यासकांच्या मते, मुंबईच्या पश्चिम आणि मध्य उपनगरांत रविवारी पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता आहे. तसेच, आगामी बुधवारपासून राज्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

## 'आधी शिक्षणमंत्री, नंतर थेट प्रधानमंत्र्यांचा राजीनामा मागणार'

### आझाद मैदानातून आदित्य ठाकरेंचा मोदी सरकारला इशारा

मुंबई (दै. संध्या)



शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे नेतृत्वात मुंबई येथील आझाद मैदानात सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ आंदोलन करण्यात आले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला. हे सरकार या आगीत भस्म झाले पाहिजे, असे त्यांनी यावेळी बोलताना म्हटले. तर आदित्य ठाकरे यांनी देखील यावेळी बोलताना केंद्र सरकारवर टीका केली आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, देशातल्या तरुण आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी आज आंदोलने होत आहेत. आम्ही आता केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहोत. पण ही तर फक्त सुरुवात आहे. पुढे जाऊन आम्ही थेट या देशाच्या पंतप्रधानांच्या राजीनाम्याची मागणी करणार आहोत, असा आक्रमक इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला. पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, सोनम वांगचुक यांनी या आधीही लडाखला विशेष राज्याचा दर्जा मिळावा यासाठी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन केले होते. लोकसभा निवडणुकीच्या आधी भाजपने लडाखच्या जनतेला तसे आश्वासनही दिले होते. मात्र, भाजपला लडाखची जमीन उद्योगपती अदानी यांच्या घशात घालायची आहे. याच कारणामुळे सोनम वांगचुक यांना या आधी आंदोलन करावे लागले होते. केंद्र सरकारवर टीका करताना आदित्य ठाकरे म्हणाले, या देशातील जनतेने भाजपला देश बदलण्यासाठी आणि विकास करण्यासाठी बहुमत दिले होते. मात्र, हे लोक आता देशाचे संविधान बदलू पाहत आहेत. इस्रोच्या 100 वैज्ञानिकांनी राजीनामा दिल्याचा प्रकार समोर आला आहे. जग कुठे चालले आहे आणि आपण कुठे आहोत? भाजपला इस्रोसारख्या महत्त्वाच्या संस्था सांभाळता येत नाहीत, पण दुसऱ्या पक्षांचे खासदार फोडण्यात ते व्यस्त आहेत. 'हर घर जल', 'स्मार्ट सिटी', 'प्रत्येकाला घर' या भाजपच्या घोषणा आता कुठे गेल्या? असा सवाल ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

महाराष्ट्राचा अभिजित दिपके हा तरुण मुलगा आज दिल्लीमध्ये विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी आणि न्यायासाठी उपोषणाला बसला आहे. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी तातडीने राजीनामा द्यावा, ही त्याची प्रमुख मागणी आहे. मात्र, भाजप सरकार तरुणांच्या प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी जनतेला धर्म आणि जातीच्या वादात अडकवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे. जग पुढे जात असताना भाजप आपल्याला 50 वर्षांपूर्वी काय झाले, यात अडकवून नेहरू विरुद्ध सरदार पटेल असा भूतकाळातील वाद उकरून काढत आहे, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, पुढच्या 10 वर्षांत देशात 120 कोटी तरुणांना नोकऱ्यांची गरज असेल, मात्र केवळ 40 कोटी तरुणांनाच नोकऱ्या मिळतील अशी स्थिती आहे. भाजपच्या नेत्यांची मुले परदेशात शिकायला आणि स्थायिक व्हायला जातील. मग आपल्या सर्वसामान्य तरुणांनी कुठे जायचे? हे सरकार राम मंदिर आणि पंढरपूर लुटण्याचे काम करत आहे. त्यामुळे या भाजपसारख्या देशद्रोही पक्षाला सत्तेबाहेर काढले पाहिजे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

ढिंग-टांग




## आझाद मैदानातून ठाकरेंचा हल्लाबोल, अभिजित दीपके यांच्या लढ्यालाही पाठिंबा

# 'हे सरकार या आगीत भस्म झाले पाहिजे'

मुंबई (दै. संध्या)



दिल्लीत सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे अन्नत्याग आंदोलन सुरू असून प्रकृती खालावल्याने सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्या जागी आता दिल्लीच्या आंदोलनस्थळी कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके हे अन्नत्याग आंदोलनाला बसले असून त्यांना दिवसेंदिवस मोठा पाठिंबा मिळत आहे. याच आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी मुंबईतही माजी मुख्यमंत्री व शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीत एका आंदोलनाचे आयोजन केले होते. यावेळी वांगचूक यांच्या लढ्याला जाहीर पाठिंबा देत ठाकरे यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार आणि भाजपावर सडकून टीका केली, तसेच 'हे सरकार आता घालवले पाहिजे', असा घणाघातही त्यांनी केला.

मुंबईतील आझाद मैदानात आयोजित या आंदोलनाला ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत आणि उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यासह अनेक प्रमुख नेते उपस्थित होते. या आंदोलनस्थळी सोनम वांगचूक आणि अभिजित दीपके यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. तसेच, याप्रसंगी उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणातून मोदी सरकारवर सडकून टीका केली. उद्धव ठाकरे म्हणाले, मी आताच एक पोस्टर पाहिले. धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, असे त्यात लिहिले होते. राजीनामा ही शुल्लक गोष्ट आहे. केंद्रातील मोदी सरकार आपल्याला रोजी रोटी देऊ शकत नाही, रोजगार शिक्षण देत नाही. उत्तर देत नाही. हे सरकार बदलण्याचा लढा सुरू झाला पाहिजे, असे ठाकरेंनी म्हटले आहे.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, धर्मेंद्र प्रधान नको. सरकारच बदलायचे आहे. मी नेतृत्व करायला आलो नाही. नेते व्हा सांगायला आलो आहे. ही आग सरकार बदलेपर्यंत टिकली पाहिजे. सरकार टिकता कामा नये, या आगीत सरकार भस्म झाले पाहिजे. हा लढा फक्त वांगचुक यांचा नाही. तसेच पुढे ते म्हणाले, सत्ता भ्रष्टांना बाहेर काढल्याशिवाय राहणार नाही. ही शपथ घेऊन आंदोलनाला सुरुवात करूया, असे आवाहन ठाकरे यांनी केले.

सोनम वांगचुक यांचे समर्थनार्थ बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, सोनम वांगचुक यांनी या देशाला काय दिले आणि या दळभद्री सरकारने देशाला काय दिले, याचा हिशोब एकदा होऊनच जाऊ दे. बर्फामध्ये देशाचे रक्षण करणाऱ्या आपल्या सैनिकांसाठी वांगचुक यांनी 'सोलर कॅम्प' बनवून दिले. लडाखमध्ये पाण्याची तीव्र टंचाई असताना त्या ठिकाणी कृत्रिम 'आइस माउंटेन' ज्यांनी बनवले, आज त्याच सोनम वांगचुक यांना हे सरकार देशद्रोही आणि चीनचे हस्तक ठरवत आहे. संघावर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले, पाकिस्तानबरोबर भारताने चर्चा केली पाहिजे, असे वक्तव्य संघाच्या होसबळे यांनी केले होते आणि त्यावर मोहन भागवत यांनीही संमती दर्शवली होती. जे लोक आपल्या सैनिकांच्या जीवावर उठले आहेत, त्या पाकिस्तानसोबत चर्चेसाठी हे तयार आहेत. पण जो व्यक्ती आपल्या लष्करासाठी आणि देशासाठी अहोरात्र काहीतरी करतोय, त्याच्याशी मात्र हे सरकार चर्चेला तयार नाही. आज जे काही देशामध्ये सुरू आहे, ते संघाच्या कल्पनेतील 'हिंदू राष्ट्र' आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

उद्धव ठाकरे म्हणाले, अण्णा हजारे जेव्हा उपोषणाला बसले होते, तेव्हा त्यांना देशभरात मोठी प्रसिद्धी मिळाली. त्यावेळी त्यांना कोणीही देशद्रोही किंवा चीनचा हस्तक म्हटले नव्हते. उलट, तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी अण्णांशी सन्मानाने चर्चा करण्यासाठी विलासराव देशमुखांना पाठवले होते.

## दिल्ली हायकोर्टात सोनम वांगचुकांना दिलासा नाही

### खासगी रुग्णालयात हलवण्याची मागणी फेटाळली, आयव्ही ड्रिपबाबतही दिली माहिती

मुंबई (दै. संध्या)



दिल्ली उच्च न्यायालयाने सोनम वांगचुक प्रकरणाची सुनावणी केली. उच्च न्यायालयाने म्हटले की, या टप्प्यावर कोणत्याही अंतरिम आदेशाची आवश्यकता नाही. न्यायालयाने वांगचुक यांना डॉक्टरांना सहकार्य करण्याचे निर्देश दिले आणि त्यांना खाजगी रुग्णालयात हलवण्याची त्यांची पत्नी गीतांजली यांची विनंती फेटाळली. थोडक्यात, न्यायालयाने वांगचुक यांच्या पत्नीची याचिका फेटाळून लावली. वांगचुक यांना रुग्णालयात पाठवण्याचा निर्णय मनमानी नव्हता.

या प्रकरणी दिल्ली पोलिसांना नोटीस बजावण्यात आली असून पुढील सुनावणी २४ जुलै रोजी होणार आहे. यापूर्वी, सोनम वांगचुक प्रकरणात केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करणारे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (एएसजी) चेतन शर्मा यांनी न्यायालयाला सांगितले की, वांगचुक यांनी सुरुवातीला आयव्ही ड्रिप घेण्यास नकार दिला होता, परंतु नंतर त्यांनी त्याला संमती दिली. न्यायालयाने विचारले की, त्यांना हे उपचार त्यांच्या संमतीने देण्यात आले होते का. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल चेतन शर्मा यांनी न्यायालयाला सांगितले की, होय, त्यांनी फक्त साखर-मुक्त औषध उपलब्ध आहे का, असे विचारले होते. देशातील इतर कोणत्याही नागरिकाप्रमाणे, त्यांनी डॉक्टरांच्या उपचारांवर विश्वास ठेवला पाहिजे. त्यांची चांगली काळजी घेतली जात आहे, परंतु त्यांनी डॉक्टरांना सहकार्य केले पाहिजे. एम्सचे डॉक्टर न्यायालयात उपस्थित आहेत आणि माहिती देऊ शकतात. यानंतर, एम्सच्या डॉक्टरांनी सोनम वांगचुक यांच्या वैद्यकीय स्थितीबद्दल माहिती दिली. या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती मिनी पुष्कर्णा यांच्या न्यायालयात सुरू आहे.

### विरोधी पक्षनेते सोनम यांच्यासोबत एकवटू लागले

14 जुलै रोजी सोनम यांच्या उपोषणाच्या 16 व्या दिवसापासून विरोधी नेत्यांचा पाठिंबा वाढू लागला. टीएमसी प्रमुख ममता बॅनर्जी यांनी फोनवरून त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. 16 जुलै रोजी आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल जंतर-मंतरवर पोहोचले आणि त्यांनी एक दिवसाचे उपोषण केले. समाजवादी पक्षाचे अनेक खासदार, जसे की - डिंपल यादव, धर्मेंद्र यादव आणि उत्तर प्रदेशचे प्रदेशाध्यक्ष नरेश उत्तम, आमदार डॉ. रागिनी सोनकर जंतर-मंतरवर पोहोचले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार अरविंद सावंत आणि सीपीआय(एम) च्या नेत्या सुभाषिनी अली देखील जंतर-मंतरवर पोहोचल्या. सावंत म्हणाले की, ते पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा संसदेत मांडतील.

# संपादकीय

## नागपूर जागतिक सहकार्याचे केंद्र

जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या ब्रिक्स देशांच्या परिवहन मंत्र्यांची तिसरी परिषद नुकतीच नागपुरात उत्साहात पार पडली. अकरा सदस्य राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेली ही तीनदिवसीय परिषद भारताच्या जागतिक नेतृत्वाची आणि नागपूरच्या वाढत्या जागतिक महत्त्वाचा ठसा उमटवून गेली.

ब्रिक्स देशांचा समूह हा जगातील विकसनशील देशांचा समूह म्हणून ओळखला जातो. यात भारत, चीन, रशिया इंडोनेशिया, इथोपिया, इराण, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, ब्राझील, संयुक्त अरब अमिराती यांसह अकरा विकसनशील देशांचा समावेश आहे. पाश्चिमात्य देशांच्या दादागिरीला तोंड देण्यासाठी विशेषतः राजकीय आणि आर्थिक समस्यांचा निवाडा करण्यासाठी आणि डॉलरचा प्रभाव कमी करण्यासाठी २००६ मध्ये या समूहाची स्थापना करण्यात आली होती. त्यावेळी ब्राझील, रशिया, भारत, म्हणजे इंडिया, चीन म्हणजेच चायना आणि दक्षिण आफ्रिका म्हणजेच साऊथ आफ्रिका या देशांचा समावेश होता त्यामुळेच बीआरआयसीएस म्हणून ब्रिक्स देशांचा समूह असे या समूहाचे नाव पडले हळूहळू आणखी काही विकासाची देश यात जुळले आणि आज एकूण ११ देशांचा यात समावेश आहे. विकसनशील देशातील परिवहन समस्यांवर चर्चा करण्यासाठी गेल्या आठवड्यात नागपुरात या ब्रिक्स देशांच्या परिवहन मंत्र्यांची एक बैठक केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आली होती. ही या समूहाची परिवहनविषयक तिसरी बैठक असल्याचे सांगण्यात आले होते. ९ जुलैपासून या देशांचे प्रतिनिधी नागपुरात येण्यास सुरुवात झाली. १० जुलैला सचिव स्तरावर बैठकी झाल्या, तर ११ जुलैला हॉटेल रेडिसन ब्ल्यू येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन झाले. ११ आणि १२ जुलैला या ब्रिक्स देशातील परिवहन मंत्र्यांच्या चर्चेनंतर या परिषदेचा १२ जुलै रोजी समारोप पार पडला. या तीन दिवसांच्या परिषदेचा समारोप होताना कार्बनमुक्त वाहतूक, तसेच रेल्वे संशोधन आणि हरित वाहतूक यावर विशेष मोहोर उठवण्यात आली. या परिषदेत मंत्रीस्तरीय घोषणा पत्राला देखील मंजुरी करण्यात आली. यानिमित्ताने नागपूर हे जागतिक सहकार्याचे केंद्र बनले आहे, ही बाब तिथे विशेषत्वाने नमूद करायलाच हवी. यावर्षी या परिषदेचे अध्यक्षपद भारताकडे होते, त्यामुळेच ही बैठक भारतात नागपूरला आयोजित केली गेली होती. परिषदेला संबोधित करताना केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी शाश्वत सुरक्षित हरित आणि तंत्रज्ञानाची आधारित वाहतूक व्यवस्थेसाठी ब्रिक्स राष्ट्रांनी अधिक व्यापक सहकार्य करण्याचे आवाहन केले. याचवेळी त्यांनी भारताने परिवहनविषयक पायाभूत सुविधांमध्ये गत बारा वर्षांत काय परिवर्तन केले याचा लेखाजोखा जगासमोर मांडला. याचवेळी शाश्वत वाहतुकीचा रोड मॅप निश्चित करा असेही त्यांनी सुचवले. यावेळी मंजूर करण्यात आलेल्या घोषणापत्रात शाश्वत विमान इंधन वापरावर भर देताना कार्बनमुक्तीकरण कसे करता येईल यावर विचार करण्याचे ठरले आहे. त्याचबरोबर अर्बन मोबिलिटी हबची संकल्पना मांडून लॉजिस्टिक पुरवठा साखळीतील सहकार्य कसे करता येईल यावरही विचार करण्याचे ठरले आहे. ब्रिक्स रेल्वे संशोधन नेटवर्कची स्थापना करण्याचा देखील यावेळी बैठकीत निर्णय घेण्यात आलेला आहे. ब्रिक्स सदस्य देशांचे परिवहन मंत्री आणि परिवहन मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच तांत्रिक तज्ज्ञ या तीनदिवसीय बैठकीत सहभागी झाले होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक, मंत्रीस्तरीय बैठक, द्विपक्षीय चर्चा आणि सदस्य देशांमधील संस्थात्मक सहकार्य व लोकसंपर्क अधिक दृढ होण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या बैठकीत भारताच्या प्रतिनिधींसह इथिओपियाचे परिवहन व दळणवळण मंत्री आलेमु सिमे, संयुक्त अरब अमिरातीचे अर्थमंत्री बिन लोक अल्मरी, रशियाचे परिवहन मंत्री रोमन स्टारोवोईस, इंडोनेशियाच्या सार्वजनिक बांधकाम व गृहनिर्माण मंत्रालयाचे सहाय्यक हॅरी तिसापुत्र जूता, चीनचे परिवहन मंत्री हान जून, ब्राझीलचे परिवहन मंत्री रेना पिनभो, भारतातील इजिप्तचे राजदूत एच इ कामेल आयत गलाल, इराणचे ऊर्जामंत्री आली अकबर मेहराबियास तसेच दक्षिण आफ्रिकेचे उपपरिवहन मंत्री मखू लिखो डेंगवा उपस्थित होते.

## संस्कृत सुभाषित

हंस: श्वेतो बक: श्वेत: को भेदो बकहंसयो :।
नीरक्षीरविवेके तु हंसो हंसो बको बक:॥

अर्थ – हंस पांढरा, बगळाही पांढरा, मग हंस आणि बगळा यांच्यात फरक काय? पण दूध आणि पाणी वेगळे करताना हंस हंसच आणि बगळा बगळाच– (ठरतो)(नीरक्षीरविवेक फक्त हंसच करतो.)

## गुरु वचन

### बाळगा सकारात्मक दृष्टिकोन

यश–अपयश हा जीवनाचा घटनक्रम आहे. यश म्हणजे योगायोग नव्हे. तो दृष्टिकोनाचा परिणाम आहे. नीतीपूर्वक चालल्यानंतरच खरे यश मिळते. यश म्हणजे काही रहस्य नाही तर काही आधारभूत नियमांचे सातत्याने पालन केल्याचा तो सुखद परिणाम आहे. प्रसिध्द विचारवंत अर्ल नाईटिंगेलच्या मते, मूल्यवान लक्ष्याची सतत प्राप्ती होणे म्हणजेच यश होय. ध्येय किंवा लक्ष्य प्राप्तीनंतर थांबणे म्हणजे यशाचा शेवट आहे. श्रेष्ठतेचा प्रयत्न म्हणजेच यश होय. खऱ्या यशाचे मापदंड आहेत काम योग्य प्रकारे पूर्ण करणे आणि आपले लक्ष्य प्राप्त करणे. कोणत्याही क्षेत्रात यश प्राप्त करण्यासाठी पूर्ण तयारी आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यकता आहे ती उद्देश, सिध्दांत, योजना, अभ्यास, सततचे प्रयास, धैर्य आणि अभिमान या गोष्टींची. बहाणेबाजी, संधी ओळखण्यातील अयोग्यता, भीती, अनुशासनची कमतरता, कमजोर स्वभाव, ज्ञानाचा अभाव, साहसाचा अभाव ही देखील अपयशाची कारणे आहेत. ती दूर करूनच यश प्राप्त केले जाऊ शकते. जीवनात अपयशच खरा सोबती आहे. त्याचं स्वागत केलं पाहिजे. तो नम्रता, संयम आणि धैर्याचे शिक्षण देतो. अडचणीच्या काळात साहस आणि विश्वास प्राप्त करण्यास मदत करतो. व्यक्तीने नेहमी कठीण परिस्थितीतून वर येत जगलं व जिंकले पाहिजे. इतके केल्यानंतर तुम्ही यश सहजतेने मिळवू शकता.

## उपदेशकथा

ईश्वरदर्शनासाठी अनेक मार्ग आहेत. त्यापैकी भक्तीमार्ग सोपा आहे खरा, परंतु भक्तीमार्गामध्ये आपल्या इष्ट देवतेवर अथवा सद्गुरूवर अनन्य प्रेम असावे लागते. संत मीराबाईपाशी असे प्रेम होते. तिच्या चित्तामध्ये एका श्रीकृष्णावाचून अन्य कोणासही स्थान नव्हते. मीरा म्हणते, 'सासूबाई! गोविंद माझा गुरू व एकमेव देव आहे. मी गणगौरीची पूजा करणार नाही.' सासू म्हणाली, 'इतर लोक इतके गणगौरीची पूजा करतात. ती मनोवांछित फल देते. मग तू तिची पूजा का करीत नाहीस?' यावर मीरा म्हणाली, 'माझे प्रेम एका गोविंदावर आहे. त्याचे रहस्य कोणाला कसे कळणार? म्हणून मी अन्य देवाची पूजा करणार नाही.' पुन्हा सासू म्हणाली, 'बाळपणी तू गोविंदावर प्रेम केलेस. तसे करणे हे साधूसंतांचे काम आहे. तू राठोडकन्या आहेस. तुला भगवंताने राज्य दिले आहे.' तेव्हा मीरा म्हणाली, 'ज्याला कोणाला राज्य करायचे असेल त्याने करावे. मी तर श्रीकृष्णाची दासी आहे. मला त्याच्या दर्शनाची आस आहे. मी साधूसंतांची सेवा करणार.' तरी सासू पुन्हा म्हणाली, 'सासरच्या व माहेरच्या लोकांना, साऱ्या नातेवाईकांना तुझी लाज वाटते. सारे जग तुला वाईट म्हणते.' मग मात्र मीराने अखेर सांगितले की, 'सासूबाई! मी काही चोरी केली नाही किंवा वाईट कर्म केले नाही. पुण्यमार्गाने चालत असता मी जगाची पर्वा का करू? मला सद्गुरू रैदास भेटले. आणि मला भगवंताच्या दर्शनाचा मार्ग सापडला.'

कथा उपदेश : आपल्या साधनावर निष्ठा आणि भेटीची तळमळ या दोन चाकांवर भक्तीचा रथ सरळ चालतो.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:शिव १८:३६:३७ |
| २० जुलै २०२६ | करण:गर १५:४१:०८ |
| सोमवार | करण:वणिज |
| विक्रम संवत्– २०८२ | २८:०३:०७+ |
| आषाढ शके | सूर्य:कर्क |
| संवत्– १९४८ | चन्द्र:कन्या |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४८ |
| अयन– दक्षिणायण | मुस्लिम मास – सफर |
| मास– आषाढ | तारीख – ५ |
| ऋतु – सौर वर्षा | विशेष |
| शुक्ल पक्ष | विवस्वत सप्तमी |
| तिथि:सप्तमी २८:०३:०७+ | सूर्याचा पुष्य नक्षत्रप्रवेश |
| नक्षत्र:हस्त १९:०९:१६ | वाहन: उंदीर |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०१६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | 6 | | | 5 | | 4 | |
| | 3 | 2 | | | | | 7 | 6 |
| | | 8 | | 7 | 3 | | 1 | |
| 4 | | 9 | | | | 7 | 8 | |
| 8 | 2 | | | | | | 9 | 3 |
| | 5 | 7 | | | | 4 | | 2 |
| | 9 | | 4 | 2 | | 1 | | |
| 6 | 8 | | | | | 9 | 2 | |
| | 1 | | 9 | | | 6 | 3 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०१५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 7 | 5 | 1 | 3 | 2 | 6 | 8 | 4 |
| 4 | 3 | 1 | 9 | 8 | 6 | 7 | 5 | 2 |
| 8 | 6 | 2 | 5 | 7 | 4 | 1 | 9 | 3 |
| 5 | 2 | 7 | 4 | 6 | 3 | 9 | 1 | 8 |
| 1 | 4 | 3 | 8 | 9 | 7 | 2 | 6 | 5 |
| 6 | 8 | 9 | 2 | 5 | 1 | 3 | 4 | 7 |
| 2 | 5 | 4 | 3 | 1 | 9 | 8 | 7 | 6 |
| 3 | 9 | 6 | 7 | 4 | 8 | 5 | 2 | 1 |
| 7 | 1 | 8 | 6 | 2 | 5 | 4 | 3 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ५१४ – हॉर्मिस्दस पोपपदी.
- १४०२ – तैमुर लंगने तुर्कस्तानमधील अंकारा शहर जिंकले.
- १८६४ – अमेरिकन गृहयुद्ध – पीचट्री क्रीकची लढाई.
- १८७१ – ब्रिटीश कोलंबिया कॅनडात सामील झाले.

### राष्ट्रीय

- १७६१ – माधवराव पेशवे यांना वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी पेशवाईची वस्त्रे बहाल करण्यात आली.
- १८२८ – मुंबई वर्तमान या बहुधा पहिल्या मराठी वृत्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित.
- १९०८ – बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या प्रयत्नाने बँक ऑफ बडोदाची सुरुवात.
- १९४४ – मुंबईत सरकारी अधिकाऱ्यांनी मान्य केले की शहरात कॉलेराच्या साथीनेच ३४,०० लोक मृत्युमुखी पडले.

### जन्म

- ८१० – इमाम बुखारी, हदीथचे संपादक.
- १५३१ – संत तुलसीदास, हिंदी भाषेतील श्रेष्ठ कवी.
- १८९० – जॉर्ज दुसरा, ग्रीसचा राजा.
- १९०० – मॉरिस लेलेंड, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९११ – बाका जिलानी, भारतीय क्रिकेट खेळाडू.
- १९१९ – सर एडमंड हिलरी, गिर्यारोहक.
- १९२९ – राजेंद्र कुमार, भारतीय अभिनेता.
- १९५० – नसीरुद्दीन शाह, भारतीय अभिनेता.

### निधन

- ९८५ – पोप बॉनिफेस सातवा.
- १०३१ – रॉबर्ट दुसरा, फ्रांसचा राजा.
- ११५६ – टोबा, जपानी सम्राट.
- १३२० – ओशिन, आर्मेनियाचा राजा.

## : SMS :

A man just before marriage :"SUPERMAN"
After marriage : "GENTLEMAN"
After ten years : "WATCHMAN"
After twenty years :"DOBERMAN"

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.२ | २४.१ |
| अहमदनगर | ३०.४ | २३.४ |
| अकोला | ३३.४ | २६.४ |
| अमरावती | ३०.१ | २६.४ |
| बीड | २९.६ | २६.३ |
| भंडारा | ३१.१ | २४.४ |
| बुलढाणा | ४७ | ३३.४ |
| चंद्रपूर | ३०.३ | २६ |
| चेन्नई | ३८.२ | २७ |
| नवी दिल्ली | ४५.५ | ३७.५ |
| धुळे | ३५.७ | २६.७ |
| गोंदिया | ३०.६ | २४.१ |
| जळगाव | ३२.३ | २६.१ |
| कोल्हापूर | २६.८ | २३.१ |
| लातूर | ३१.४ | २४.५ |
| मुंबई | ३६.८ | ३०.९ |
| नागपूर | ३१.७ | २५.९ |
| नांदेड | ३४.६ | २५.८ |
| नंदूरबार | ३२.२ | २५.२ |
| नाशिक | २७.४ | २३.८ |
| पुणे | २५.५ | २२.७ |
| पंढरपूर | ३३.५ | २४.६ |
| सातारा | २७.१ | २३.१ |
| सांगली | २७.४ | २३.४ |
| सोलापूर | ३२.८ | २४.७ |
| वर्धा | ३०.८ | २६.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग–हिरवा, शुभ दिशा– पूर्व प्रतिष्ठीत भेटी होतील. व्यापारात आपल्या निर्णयाचा फायदा मिळेल.

**तुळ :** शुभ रंग –पिवळा, शुभ दिशा –दक्षिण व्यवसायिक समस्या दूर होईल. मुलांची प्रगती राहील.

**वृषभ :** शुभ रंग– निळा, शुभ दिशा– पूर्व उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका. व्यापारिक संकटामुळे चिंता राहून धावपळ वाढणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग– लाल, शुभ दिशा–पश्चिम बुद्धीमत्तेवर अनेक समस्या दूर होतील. अचानक धनप्राप्ती होण्याचा योग आहे. प्रिय व्यक्तिची गाठ होईल.

**मिथुन :** शुभ रंग– हिरवा – शुभ दिशा– पूर्व आर्थिक स्थिती चांगली राहिल्याने मन आनंदी राहील. कौटुंबिक चिंता दूर होऊ शकते.

**धनु :** शुभ रंग– गुलाबी, शुभ दिशा– पश्चिम मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान कमी होईल.

**कर्क :** शुभ रंग– पिवळा, शुभ दिशा– पश्चिम जीवनसाथीच्या प्रगतीमुळे सामाजिक मान सन्मान वाढणार आहे.

**मकर :** शुभ रंग– लाल – शुभ दिशा– पूर्व अचानक धन मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायीक वाद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येईल.


**सिंह :** शुभ रंग– हिरवा, शुभ दिशा–दक्षिण व्यवहार कुशलतेमुळे अधिकारी खुष राहतील. वहान सुख मिळेल. आळस दूर करा.

**कुंभ :** शुभ रंग– पांढरा, शुभ दिशा– पूर्व प्रयत्न व दूरदर्शिपणा यामुळे आपल्याला इतरांकडून समर्थन मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**कन्या :** शुभ रंग– हिरवा, शुभ दिशा– दक्षिण कौटुंबिक सुख व पत्नीच्या सहयोगाने मन प्रसन्न राहील. स्वाध्यायात गोडी वाटेल.

**मीन :** शुभ रंग– पिवळा, शुभ दिशा– दक्षिण व्यापारातील हेतु साध्य होण्याकरिता प्रयत्न करावे लागतील. आकर्षक प्रस्ताव आपल्याला येतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०१६



### आडवे शब्द

१. रात्रीच्या रात्री
४. फोटो
६. राष्ट्रगीताची सुरुवात
११. शंभर पैसे
१३. बाजेची कापडी पट्टी
१४. सोन्याचा धागा
१५. वाईट
१७. हमाल
१९. निबर, एक इंग्रजी महिना
२१. अडत्या
२३. खर्चच्या विरूद्ध
२५. पोवाडे म्हणणारा
२७. फांदी तुटतानाचा आवाज
२९. नाणी पारखणारा, दत्तो वामन यांचे आडनाव
३१. रोख
३२. नरकासुराचे प्रतीक म्हणून फोडले जाणारे फळ
३४. मालक
३५. हे जसे–फळ तसेच!
३६. पाळता येईल असा प्राणी
३८. कोष्टी, कापड विणणारा
४०. दिल्लीचे विमानतळ
४२. छोटा, लहान
४३. सैन्य
४४. कवडीमोल
४६. शहर, ४८. मुलगा, पुत्र
५१. जुळे
५२. उगीच
५४. 'सबसे तेज' वृत्तवाहिनी
५६. शेतकरी (हिंदी)
५८. गाजावाजा
५९. पळून जाणे
६०. मोठी गंमत
६१. रंग बदलणारे फूल
६२. नम्र, वाकलेला
६४. एक आंबट–गोड फळ
६५. खूप
६६. चालू दिवस
६७. ओघ, पाण्याचे वाहणे
६९. थडगे
७१. फटाक्याची माळ
७२. नारळ वाढवण्याची प्रथा या कुप्रथेऐवजी प्रचलित झाली
७४. मृत्यूदेवता
७५. जनक राजाची मुलगी
७८. झडती (हिंदी)
७९. एकूण एक, सर्व
८०. फेटाळणे
८१. लक्ष्मी

### उभे शब्द

१. अडखळत बोलणारा
३. झाड, वृक्ष
४. सावली, ५. पुष्कळ
६. आई–वडील, ७. नवीन
८. नडलेला अडलेला
९. मला, १०. श्रेष्ठ पुरुष
१२. पैंजण, १५. पाषण
१६. पाणकोंबडा
१७. हिंदुस्थान
१८. राबता, ये–जा
२०. धुंदी, कैफ
२२. आवडता, प्रिय
२४. कापड विणण्याचे साधन
२६. साठावा वाढदिवस
२८. कोवळी फांदी
२९. चाळीस शेर
३०. पोते शिवण्याची सुई
३३. जाड दोर
३४. पृथ्वी
३६. हालचालीवर ठेवलेली नजर
३७. वर्तुळ
३८. गणपती
३९. कमीत कमी व जास्तीत जास्त
४०. अधिक प्रमाणात लोह असणारी पालेभाजी
४१. दुसऱ्याचे विचार जाणणारा
४५. श्रीकृष्णाचे एक नाव
४७. रविवार
४९. दृष्टीभेट
५०. प्रकाश, कांती
५३. मूळ अर्थ सुंदर, शहाणा प्रचलित अर्थ शहरी
५४. देवाण–घेवाण
५५. रेलण्याची उशी
५७. प्रामाणिक
६०. श्रीमंत
६१. दाहक आम्ल (हिंदी)
६३. ग्रामीण बोलीत तेव्हा
६५. लाभदायक
६६. आजूबाजूला
६८. अंकित माणूस, हेर
६९. लावणीतील पास असे असते!
७०. प्रजा
७३. मांडणी
७४अ. मज
७५. एक मिश्र धातू
७६. ओटा, पार
७७. न्यायाने वागणारा


### जम्बो शब्दकोडे क्र. १०१५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.प्रवासी ३.जालशय ७.ठाण मांडणे ११.नजर मरणे १२.जर १३.साग १४.समूह १६.नीरा १७.कबर १८.अमर १९.कदर २०.सकवार २१.सहाण २४.माजघर २६.जत्रा २७.ना हरकत प्रमाणपत्र ३१.नेता ३२.संघर्ष ३३.जागा ३५.तरतरीत ३७.नरवर ३९.तरट ४२.मळा ४४.वस्त ४६.ठकविणे ४८.टवकारणे ५०.रसद ५२.उणे ५३.शारदा ५६.वळ ५७.पल ५८.दमट ६०.परत परत ६३.विकार ६४.पराग ६५.मासा ६७.वाचा ६९.तनय ७०.कडकडाट ७९.अनाकलनीय ७३.दावा ७५.भाट ७६.रीस ७७.जनन मरण ७८.कोट

उभे उत्तर : १.प्रशंसक २.सीताहरण ३.जननी ४.लाजरा ५.शर ६.यमलोक ७.ठाणेकर ८.मांजर ९.डर १०.आगरकर १३.साम १५.मूद १८.अनुज २०.सणक २१.सह २२.हारजीत २३.ऋण २४.मात्र २५.घरघर २६.जन्मजात २७.नाताळ २८.तळतळात २९.माहूत ३०.पवन ३२.संवत्सर ३४.गारठणे ३६.रम ३८.रव ४०.टक ४१.कणेर ४३.वरवर ४५.वादळ ४७.विशाल ४९.वजा ५१.सवत ५२.उतावीळ ५४.दादरा ५५.कूप ५७.परवाना ५९.मग ६०.पसायदान ६१.तडक ६२.रजक ६५.मान ६६.वटवट ६८.चाकरी ७१.अट ७२.लस ७४.वाम

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप अनिवार्य; पुण्यात राज्यस्तरीय कार्यशाळा

पुणे (दैनिक संध्या) : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप अनिवार्य करण्यात आल्यानंतर त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी २४ जुलै रोजी पुण्यात राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (एमएसएफडीए), पुणे येथे होणाऱ्या या कार्यशाळेत राज्यभरातील २०० हून अधिक महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य आणि विभागप्रमुख सहभागी होणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ५ फेब्रुवारी २०२४ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये ८ ते १२ श्रेयांक असलेली इंटर्नशिप अनिवार्य करण्यात आली आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीदरम्यान महाविद्यालयांना येणाऱ्या शंकांचे निरसन करणे आणि उद्योग व शिक्षण क्षेत्रातील समन्वय वाढवणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश आहे. कार्यशाळेत शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, कॉर्पोरेट प्रतिनिधी आणि नामवंत उद्योगतज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. तसेच प्रत्येक महाविद्यालयात इंटर्नशिप कक्ष स्थापन करणे, स्थानिक उद्योगांशी सामंजस्य करार करणे आणि विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिपचे पारदर्शक मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक तत्त्वांवर सविस्तर चर्चा होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

### पुणे महापालिकेचीच कोट्यवधींची थकबाकी; मालमत्ता भाड्यापोटी 35 कोटी अडकले

पुणे (दैनिक संध्या) : सामान्य पुणेकरांकडून मिळकतकर आणि पाणीपट्टीची दमडी-दमडी वसूल करण्यासाठी जप्तीची कारवाई करणारी महानगरपालिका स्वतःच्या हक्काची वसुली करण्यात मात्र पूर्णपणे अपयशी ठरल्याचे समोर आले आहे. महापालिकेच्या मालकीच्या हजारो सदनिका, इमारती आणि मोकळ्या जागांच्या भाड्यापोटी तब्बल ३५ कोटी ४४ लाख २८ हजार ६१० रुपयांची अवाढव्य थकबाकी असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. महापालिकेच्या मोक्याच्या मालमत्तांचा वापर करून खासगी कमाई करणाऱ्या भाडेकरूंनी महापालिकेला चुना लावला असून, प्रशासन मात्र थकबाकीदारांवर कारवाई करण्यास कमालीचे सुस्त असल्याचे चित्र आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी नगरसेवक देवेंद्र वडके यांनी मालमत्ता विभागाच्या कारभारावर आणि थकीत भाड्यावर लेखी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाला मिळालेल्या अधिकृत उत्तरातून महापालिकेच्या ढिम्म कारभाराचे धिंडवडे निघाले आहेत. या माहितीनुसार, पुणे महापालिकेच्या मालकीच्या एकूण १ हजार १३२ सदनिका, २६३ भव्य इमारती (भवन) आणि १ हजार ५५२ मोकळ्या जागा आहेत. या मालमत्तांचे भाडे वेळेत वसूल न केल्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नावर अत्यंत प्रतिकूल परिणाम झाला आहे. एकूण थकबाकीमधील सर्वाधिक धक्कादायक वाटा हा मोकळ्या जागा आणि जमिनींच्या भाड्याचा आहे. महापालिकेच्या १ हजार २१३ जमिनींच्या भाड्यापोटी तब्बल २४ कोटी ९९ लाख १० हजार १६३ रुपये थकले आहेत. अनेक कंत्राटदार आणि संस्थांनी महापालिकेच्या जागा कवडीमोल भाड्याने घेऊन त्यावर स्वतःचा व्यवसाय थाटला आहे, मात्र त्याचे भाडे पालिकेला दिलेले नाही. सदनिका आणि इमारतींची थकबाकी देखील कोट्यवधींच्या घरात असून, थकबाकीदारांच्या या मनमानीमुळे प्रामाणिक करदात्या पुणेकरांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### माझ्या भावाला लवकर न्याय मिळावा; बहिणीची आर्त हाक

पुणे (दैनिक संध्या) : केतन अगरवाल हत्या प्रकरणात केतनला न्याय मिळावा या मागणीसाठी, त्याची बहीण संजना अगरवाल हिने शनिवारी (दि. १८) श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात जाऊन प्रार्थना केली. कुटुंबातील सदस्यांसोबत संजना सकाळीच बाप्पाच्या दर्शनासाठी आली होती. कायदेशीर प्रक्रियेद्वारे या प्रकरणात निष्पक्ष व जलद निकाल लागेल अशी आशा तिने यावेळी व्यक्त केली. केतनच्या हत्येला शनिवारी एक महिना पूर्ण झाला. सुरुवातीला लोहगड किल्ल्यावरून अपघाती मृत्यू झाल्याचे प्रकरण नंतर एक क्रूर कट असल्याचे समोर आले. या हत्येची शंका सगळ्यात आधी केतनची बहीण संजनाला आली होती. तिच्या संशयाने या प्रकरणात मोठी भूमिका बजावली. भावाच्या निधनाला एक महिना पूर्ण झाल्याच्या वेदनादायी क्षणी संजनाने आपल्या भावना व्यक्त केल्या.




# पुण्यात वीजचोरांवर महावितरणचा प्रहार

**१२८१ वीजचोरांवर कारवाई; ८१ लाखांचा दंड**

पुणे (दै. संध्या)

महावितरणकडून वीजचोरांवर वेळोवेळी कारवाई करण्यात येतेच. परंतु, मागील पंधरा दिवसांत पुणे परिमंडलात धडक मोहीम राबवून १२८१ वीजचोरांवर कारवाई करण्यात आली आहे. या वीजचोरांना ३४०७३० युनिट वीज चोरी केल्यापोटी ८१ लाख ५५ हजारांचा दंड ठोठावण्यात आला असून, जे दंड भरणार नाहीत त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाणार असल्याचे महावितरणने सांगितले आहे.

भारतीय विद्युत अधिनियम २००३ अंतर्गत कलम १३५ व १३८ अन्वये मीटरमध्ये फेरफार करुन अथवा वीज यंत्रणेद्वारे थेट आकडा किंवा केबल टाकून वीजचोरी करणाऱ्यांवर महावितरण कारवाई करते. तसेच विजेचा वेगळ्या कारणांसाठी वापर केल्यास कलम १२६ अंतर्गत दंड ठोठावण्यात येतो.



महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी नुकत्याच घेतलेल्या आढावा बैठकीत वीजचोरांवर धडक मोहीम राबवून कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी संपूर्ण परिमंडलात धडक मोहीम राबविली. ज्यामुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत.

रास्तापेठ शहर मंडलात अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्या नेतृत्वाखाली १ ते १६ जुलै दरम्यान राबविलेल्या मोहिमेत ३७५ ठिकाणी वीजचोरी आढळून आली. या वीजचोरांनी ९०७९९ युनिटची चोरी केली. त्यापोटी त्यांना २३ लाख ३० हजार ८८० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. पुणे ग्रामीण मंडलात अधीक्षक अभियंता सुरेश सवाईराम यांनी राबविलेल्या मोहिमेत ५८० वीजचोरांवर १३६९३० युनिटची वीजचोरी केल्याप्रकरणी २९ लाख ८२ हजार ६६० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

तर गणेशखिंड शहर मंडलात अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड यांनी धडक मोहीम राबवून ३२६ वीजचोरांवर कारवाई केली. या वीजचोरांनी ११३००१ युनिटची चोरी केली. त्यांना २८ लाख ४२ हजार १९० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

एप्रिल ते जुलै या महिन्यात पुणे परिमंडलात सातत्याने राबविलेल्या वीजचोरी विरोधी धडक मोहीमेत २२८३ वीजचोरांवर कारवाई करण्यात आली. या वीजचोरांनी ८७४५५९ युनिटची चोरी केली. महावितरणने त्यांना ७ कोटी ६१ लाख ३१ हजार ६९० रुपयांचा दंड आकारुन अद्दल घडवली आहे.

**महावितरणचे आवाहन**

वीज ही राष्ट्रीय संपत्ती असून, त्याची चोरी करणे कायद्याने गुन्हा आहे. दंडासोबत कारवासाची तरतूदही वीज कायद्यात आहे. तसेच वीजचोरी करताना जिविताला धोका उद्भवू शकतो. त्यामुळे नागरिकांनी नियमानुसार अधिकृत वीज जोडणी घेऊनच विजेचा वापर करावा असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी केले आहे.

## आषाढी वारीतील 'चरणसेवा' उपक्रमास पुणे जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (दै. संध्या)

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त पुणे जिल्ह्यातून मार्गक्रमण करणाऱ्या लाखो वारकऱ्यांसाठी राबविण्यात आलेल्या 'चरणसेवा' उपक्रमास यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पायी चालून आलेल्या वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना आराम मिळावा, त्यांच्या प्रवासातील शारीरिक ताण कमी व्हावा आणि सेवाभावाची परंपरा अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

वारी मार्गावरील विसावा ठिकाणी उभारण्यात आलेल्या चरणसेवा केंद्रांमध्ये स्वयंसेवकांनी अत्यंत आत्मीयतेने वारकऱ्यांचे स्वागत करत पायांची स्वच्छता, तेल मालिश तसेच आवश्यक प्राथमिक सेवा उपलब्ध करून दिली. या सेवेमुळे अनेक वारकऱ्यांनी समाधान व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.



पुणे जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, सेवाभावी संघटना, युवक मंडळे तसेच नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. स्वयंसेवकांनी निस्वार्थ भावनेने दिवसभर वारकऱ्यांची सेवा करत 'सेवा हीच खरी ईश्वरभक्ती' हा संदेश कृतीतून दिला.

श्री. रामेश्वर नाईक आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक आहे. वारकऱ्यांच्या चरणांची सेवा करण्याची संधी मिळणे हे आमचे भाग्य आहे. 'चरणसेवा' उपक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद समाजातील सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची भावना अधिक दृढ करणारा आहे. भविष्यातही अशा सेवाभिमुख उपक्रमांमध्ये अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे."

पुणे जिल्ह्यातील या उपक्रमामुळे वारकऱ्यांच्या प्रवासात दिलासा मिळाला असून भक्ती, सेवा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा सुंदर संगम अनुभवायला मिळत आहे. या उपक्रमाचे वारकरी तसेच नागरिकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे.

## पुणे विद्यापीठात १३३ कंत्राटी प्राध्यापक पदांची भरती; पात्र उमेदवारांची यादी जाहीर

पुणे (दै. संध्या)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांमध्ये पूर्णवेळ प्राध्यापक भरतीची प्रक्रिया सुरू आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठातर्फे कंत्राटी पद्धतीवर सुमारे १३३ जागा भरल्या जाणार आहेत. या जागांसाठी अर्ज केलेल्या सर्व पात्र उमेदवारांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. उमेदवार https:///admin.unipune.ac.inecruitment/ या लिंक वर जाऊन यादी पाहू शकतात.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांतील रिक्त जागांसाठी आठ हजारांहून अधिक उमेदवारांनी अर्ज केले. त्यातील पात्र उमेदवारांची यादी जाहीर करून मुलाखती घेतल्या जात आहेत. लवकरच पूर्ण वेळ सहयोगी व सहायक प्राध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेला सुरुवात केली जाणार आहे. मात्र, त्यासाठी आणखी काही महिने लागणार आहेत.

त्यामुळे विद्यापीठाने कंत्राटी पद्धतीवर पदभरती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. कंत्राटी पद्धतीवर भरती केल्या जाणाऱ्या पदासाठी उमेदवारांनी अर्ज केले. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून तात्पुरती गुणवत्ता यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर शुक्रवारी प्रसिद्ध केली आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून, विद्यापीठातील सर्व विभागांमध्ये विद्यार्थ्यांची प्रवेशप्रक्रिया राबवली जात आहे. प्रवेशित विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी पूर्णवेळ प्राध्यापक उपलब्ध नसल्यामुळे कंत्राटी पद्धतीवर प्राध्यापकांची नियुक्ती केली जात आहे. शैक्षणिक अनुभव, शैक्षणिक पात्रता आणि संशोधन या बाबी विचारात घेऊन उमेदवारांची गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा ५० हजार रुपये एकत्रित मानधन दिले जाणार आहे. विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविद्या, आंतरविद्याशाखीय अभ्यास, तसेच इतर विभागांमध्ये ही पदे भरण्यात येणार आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान विभागात जैवतंत्रज्ञान, ऊर्जा अध्ययन, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र, पर्यावरणशास्त्र, गणित, माध्यम व संवाद अध्ययन, भौतिकशास्त्र, तंत्रज्ञान, डेटा सायन्स आदी विषयांमध्ये भरती होणार आहे. त्याचबरोबर वाणिज्य, व्यवस्थापन, इंग्रजी, कायदा, इतिहास, मानसशास्त्र, समाजशास्त्र, पत्रकारिता, शिक्षण, क्रीडा शिक्षण, संगीत आणि नाट्यकला अशा विविध शाखांतील उमेदवारांनाही संधी उपलब्ध करण्यात आली आहे.

## कार्डिफमध्ये टीम इंडियाला 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'चा खास मराठमोळा जल्लोष

पुणे (दै. संध्या)

इंग्लंडमधील कार्डिफच्या मैदानावर भारत विरुद्ध इंग्लंड दुसऱ्या वनडे सामन्यादरम्यान मराठी मनोरंजनाचा खास रंग पाहायला मिळाला. सोनी मराठीवरील लोकप्रिय कार्यक्रम *"महाराष्ट्राची हास्यजत्रा"* चे समीर चौघुले आणि ओंकार राऊत यांनी या सामन्याला उपस्थित राहून टीम इंडियाला उत्स्फूर्त पाठिंबा दिला. क्रिकेट आणि मनोरंजनाचा सुंदर संगम घडवत त्यांनी सोनी स्पोर्ट्सच्या एक्स्ट्रा इनिंग्समध्ये विशेष उपस्थिती लावत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.




सामन्यादरम्यान समीर आणि ओंकार यांनी एक्स्ट्रा इनिंग्ससाठी दिलेल्या खास मुलाखतीत क्रिकेटविषयी असलेले आपले प्रेम व्यक्त केले आणि टीम इंडियाला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. इंग्लंडच्या भूमीवर भारतीय संघाने सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त करत क्रिकेटप्रेमींसोबत हा संस्मरणीय अनुभव शेअर केला.

या भेटीतील सर्वात खास क्षण म्हणजे भारतीय अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूरसोबत रंगलेल्या मराठमोळ्या गप्पा. संवादादरम्यान शार्दुलने आपण *"महाराष्ट्राची हास्यजत्रा"* चा नियमित प्रेक्षक असल्याचे सांगत समीर आणि ओंकार यांच्या अभिनयाचे मनापासून कौतुक केले. तो म्हणाला, "जशी देवाने माझ्यावर कृपा केली आहे आणि त्यामुळे मला विकेट्स घेण्याची देणगी मिळाली आहे, तशीच देणगी तुम्हा दोघांनाही मिळाली आहे. तुम्ही तुमच्या अभिनयातून आणि विनोदातून लाखो प्रेक्षकांना मनमुराद हसवता."

या खास मराठी संवादात समीर आणि ओंकार यांनी त्यांच्या गाजलेल्या 'लोचन मजनू' आणि 'मनोमिलन स्वरछेडे' या पात्रांच्या अंदाजात प्रेक्षकांशी दिलखुलास गप्पा मारत धमाल उडवली. त्यांच्या विनोदी शैलीने एक्स्ट्रा इनिंग्सचा माहोल आणखी रंगतदार झाला.

कार्डिफच्या मैदानावर उपस्थित भारतीय चाहत्यांनी समीर चौघुले आणि ओंकार राऊत यांना पाहताच त्यांच्यासोबत सेल्फी आणि छायाचित्रे काढण्यासाठी मोठी गर्दी केली. *"महाराष्ट्राची हास्यजत्रा"* मधील त्यांच्या लोकप्रिय व्यक्तिरेखा आणि अभिनयामुळे अनेक चाहत्यांनी त्यांना लगेच ओळखले आणि त्यांच्या कामाचे भरभरून कौतुक केले. मायदेशापासून हजारो किलोमीटर दूर इंग्लंडमध्येही मराठी कलाकारांना मिळालेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद मराठी मनोरंजनाच्या वाढत्या लोकप्रियतेची साक्ष देणारा ठरला.

कार्डिफच्या मैदानावर घडलेला हा संस्मरणीय क्षण केवळ सामन्याच्या निकालापुरता मर्यादित राहिला नाही; तर मराठी मनोरंजनाची लोकप्रियता देशाच्या सीमांपलीकडेही पोहोचल्याची आनंददायी झलक ठरला. समीर चौघुले आणि ओंकार राऊत यांच्या उपस्थितीमुळे क्रिकेट, मनोरंजन आणि मराठी संस्कृतीचा सुंदर संगम कार्डिफच्या मैदानावर अनुभवायला मिळाला.

# डीप टेक तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम परिसंस्था उभारणे गरजेचे- मुख्यमंत्री फडणवीस

पुणे (दै. संध्या)

क्वांटम कंप्यूटिंग आणि डीप टेक तंत्रज्ञानामुळे जगभरात मोठी तांत्रिक क्रांती घडत आहे. या तंत्रज्ञानाचा वेग आणि व्याप्ती लक्षात घेता त्याच्याशी त्वरेने जुळवून घेणे आवश्यक असून, त्यासाठी सक्षम आणि सर्वसमावेशक परिसंस्था (इकोसिस्टीम) उभारणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित 'इंटरॅक्शन विथ स्टेकहोल्डर्स फॉर फॉर्मेशन ऑफ द ग्लोबल मॅन्युफॅक्चरिंग हब अँड फ्रंटियर टेक इन्स्टिट्यूट' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, 'मित्रा'चे दीपक करंजीकर, ॲलिकॉन कास्टअॅलॉयचे हर्ष गुणे, लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोळकर, ॲक्टीन टेक्नॉलॉजीचे विकास महाजन, ब्रिगेडियर सचिन कालिया, स्ट्रॅटेजिक रिसर्च अँड ग्रोथ फाऊंडेशनचे वरुण खंदारे, सिम्बॉयसिसच्या कौशल्य अभिमत विश्वविद्यालयाच्या प्र-कुलगुरू डॉ. स्वाती मुजुमदार, माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत गिरबाने, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (आयआयएसईआर) चे प्रसन्नजित फडणवीस, पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, टाटा स्टील लिमिटेडचे माजी उपाध्यक्ष सी. आर. कुलकर्णी यांच्यासह विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २०२४ मध्ये क्वांटम कंप्यूटिंगआणि डीप टेक तंत्रज्ञानाचा जागतिक बाजार सुमारे २ ते ३ ट्रिलियन डॉलर इतका होता. पुढील पाच वर्षांत तो १६ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. मानवी इतिहासात इतक्या वेगाने वाढणारे तंत्रज्ञान यापूर्वी कधीही पाहायला मिळाले नाही. त्यामुळे या परिवर्तनाचा सक्रिय भाग बनणे भारतासाठी अत्यावश्यक आहे.

ते म्हणाले की, संयुक्त राष्ट्रांच्या 'फ्रंटियर टेक्नॉलॉजी इंडेक्स'मध्ये भारत सध्या ३६ व्या क्रमांकावर असला, तरी अपेक्षेपेक्षा सरस कामगिरी करणाऱ्या देशांमध्ये त्याची गणना होत आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत या क्षेत्रात भारताने चांगली प्रगती केली आहे. मात्र, सध्या विविध स्तरांवर सुरू असलेले प्रयत्न विखुरलेले आहेत. त्यांचे संस्थात्मकीकरण केल्यास देशाच्या प्रगतीला अधिक गती मिळू शकते.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सिलिकॉन तंत्रज्ञान आणि क्वांटम कंप्यूटिंग ही जग बदलणारी तंत्रज्ञाने असून, उद्योग-व्यवसायाच्या प्रत्येक क्षेत्रावर त्यांचा मोठा प्रभाव पडणार आहे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, या बदलांशी जुळवून घेण्यासाठी मजबूत परिसंस्था उभारावी लागेल. अन्यथा आपण जागतिक स्पर्धेत मागे पडू. विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) निधी, तांत्रिक क्षमता आणि कौशल्यांच्या अभावामुळे या तंत्रज्ञानाचा पुरेसा लाभ घेता येत नाही. त्यामुळे सर्वांसाठी उपलब्ध असलेले स्मार्ट प्लॅटफॉर्म, सुविधा आणि सक्षम मनुष्यबळ विकसित करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्राला जागतिक उत्पादन केंद्र (ग्लोबल मॅन्युफॅक्चरिंग हब) बनविण्यासाठी या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा व्यापक प्रसार होणे आवश्यक असून, त्यासाठी या क्षेत्राला समर्पित स्वतंत्र संस्था उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

केंद्र सरकारने क्वांटम कंप्यूटिंग तंत्रज्ञानासाठी विविध योजना सुरू केल्या असून, राज्यातील प्रयत्न त्या योजनांशी सुसंगत राहणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. 'मित्रा' संस्था या दिशेने काम करत असून, स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि डीप टेक क्षेत्रासाठी प्रभावी धोरणात्मक चौकट तयार करण्यासाठी सर्व संबंधित संस्था आणि धोरणांचे संस्थात्मक एकत्रीकरण करण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी सांगितले.



मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, नवीन सुविधा आणि डिजिटल प्लॅटफॉर्म उभारण्यासाठी राज्य शासन आवश्यक ती गुंतवणूक करण्यास तयार आहे. 'मित्रा'च्या माध्यमातून क्वांटम कंप्यूटिंग प्रशिक्षक तयार करण्याचा उपक्रम राबविण्यात येणार असून, पुढील दोन ते तीन वर्षांत किमान पाच हजार जणांना या क्षेत्रात प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे.

श्री.फडणवीस म्हणाले की, सध्या विविध स्तरांवर सुरू असलेले प्रयत्न एकत्र आणून त्यांचे संस्थात्मकीकरण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल. मुंबईत विकसित होत असलेल्या 'इनोव्हेशन सिटी' प्रकल्पासाठी राज्य शासनाने टाटा समूहाशी भागीदारी केली असून, त्याचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. फ्रंटियर टेक इन्स्टिट्यूटचा हा उपक्रम आणि इनोव्हेशन सिटीची संकल्पना परस्परपूरक असल्याने या दोन्ही उपक्रमांमध्ये समन्वय साधून काम करता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात उपस्थित तज्ज्ञांनी क्वांटम कंप्यूटिंग तंत्रज्ञानाच्या विविध क्षेत्रांतील संधी, संशोधन, उद्योग आणि कौशल्य विकास या विषयांवर सविस्तर चर्चा केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हर्ष गुणे यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## उरणमध्ये अमली पदार्थांविरोधात जनजागृती व कठोर कारवाईसाठी सहकार्याची ग्वाही

उरण (दैनिक संध्या) : आज नशामुक्त नवी मुंबई अभियान उरण मध्ये लीड करणारे दर्शन नाईक व प्रतिक अमृते यांनी नवी मुंबई न्हावा शेवा बंदर पोर्ट विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) विजय चौधरी यांची सदिच्छा भेट घेतली व उरणचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल त्यांचे स्वागत केले. एसीपी विजय चौधरी हे सलग तीन वेळा 'महाराष्ट्र केसरी' किताबाचे मानकरी असून आपल्या शिस्तबद्ध, कर्तव्यदक्ष आणि जनहितैषी कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय यशानंतर त्यांनी महाराष्ट्र पोलीस दलात अधिकारी म्हणूनही उल्लेखनीय सेवा बजावली आहे. या भेटीदरम्यान उरण परिसरातील अमली पदार्थांचे व्यसन, ड्रग पेडलिंग तसेच युवकांमध्ये वाढत असलेल्या व्यसनाच्या समस्येवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अमली पदार्थांच्या विक्री व वितरणाविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी पोलीस प्रशासन व सामाजिक संस्थांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. यावेळी शाळा, महाविद्यालये तसेच विविध सामाजिक संस्थांमध्ये संयुक्तपणे अमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम व मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. या उपक्रमांसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन एसीपी विजय चौधरी यांनी दिले. सामाजिक सहभाग, जनजागृती आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतून उरण परिसराला अमली पदार्थमुक्त करण्याच्या दिशेने ही भेट महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## द्रोणागिरीतील नागरिकांचे मूलभूत हक्क धोक्यात

उरण (दैनिक संध्या) : द्रोणागिरी नोडमधील नागरिकांना आजही पिण्याचे पाणी, सुरक्षित रस्ते, स्वच्छ गटारे आणि आरोग्याच्या मूलभूत सुविधा मिळत नसल्याने संतापाची लाट उसळली आहे. नागरिकांनी सिडकोच्या मुख्य अभियंत्यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, अन्यथा तीव्र आंदोलन आणि उपोषणाचा इशारा दिला आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, द्रोणागिरी नोडचा विकास करताना सिडकोने दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात अनेक वर्षांनंतरही पाणी, रस्ते, गटारे आणि आरोग्य सुविधा या मूलभूत समस्या कायम प्रलंबित आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा एक दिवसाआड होत असून, काही ठिकाणी मात्र मुबलक पाणी दिले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

# नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालयाचा स्थापना दिन उत्साहात

## डॉ. शीतलकुमार रवंदळे 'स्कॉलर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित



पुणे (दै. संध्या) :

मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालयाचा ५८ वा स्थापना दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित 'विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटमध्ये प्राध्यापकांची भूमिका' या विषयावरील स्थापना दिन व्याख्यान आणि 'स्कॉलर ऑफ द इयर' व 'बेस्ट अल्युमनी' पुरस्कार वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. शीतलकुमार रवांदळे, अधिष्ठाता, इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्शन व केंद्रीय प्लेसमेंट सेल, पीसीईटी, पुणे उपस्थित होते. मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त प्रा. सचिन सानप, डॉ.अशोक चांडक, मुख्य वित्त अधिकारी डॉ. आर. गणेशन, प्राचार्या प्रा. डॉ. वृषाली रणधीर, उपप्राचार्य प्रा. डॉ. महेंद्र आगळे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. डॉ.सोनिया अय्यंगार, पर्यवेक्षक राजू मते यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त प्रा. सचिन सानप यांनी मॉर्डन एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेचा आढावा घेऊन मॉडर्न एज्युकेशन सोसायटी ही धर्मनिरपेक्ष संस्था म्हणून नावारूपाला आली असून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या 200 व्या जयंतीनिमित्त मुलींना मोफत शिक्षण देण्याचे संस्थेकडून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या . डॉ. वृषाली रणधीर यांनी केले.प्रास्ताविकात प्रभारी प्राचार्या प्रा. डॉ. वृषाली रणधीर यांनी महाविद्यालय आणि मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या उज्ज्वल शैक्षणिक परंपरेचा आढावा घेतला. बदलत्या काळातील आव्हाने लक्षात घेऊन 'जेन-झी' पिढीला आजच्या काळाशी सुसंगत, कौशल्याधिष्ठित आणि रोजगाराभिमुख शिक्षण देणे ही महाविद्यालयाची प्रमुख जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख वक्ते डॉ. शीतलकुमार रवंदळे यांनी 'विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटमध्ये प्राध्यापकांची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन करत शिक्षकांचे स्थान समाजात सर्वाधिक आदराचे असल्याचे सांगितले. त्यामुळे शिक्षकांनी बदलत्या काळाची गरज ओळखून स्वतःमध्ये सातत्याने ज्ञानवृद्धी करत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), आधुनिक तंत्रज्ञान, संवादकौशल्ये आणि उद्योगजगताच्या अपेक्षांनुसार आवश्यक कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना केवळ पदवी नव्हे, तर रोजगारक्षम आणि आत्मनिर्भर बनविणारे शिक्षण देणे ही शिक्षकांची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येक विद्यार्थ्याने संवादकौशल्य, इंग्रजी संभाषण, सॉफ्ट स्किल्स, ऑनलाइन अभ्यासक्रम, इंटर्नशिप आणि प्रकल्पाधारित शिक्षणाचा लाभ घेत ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करण्यावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.सूत्र संचालन प्रसेनजीत रणीत व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उप प्राचार्य प्राध्यापक डॉ.महेंद्र आगळे यांनी केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. शीतलकुमार रवंदळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते 'स्कॉलर ऑफ द इयर' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले तसेच उत्कृष्ट माजी विद्यार्थी पुरस्कार ज्येष्ठ संगीतकार आणि चित्रपट निर्माते अनिल काकडे यांना देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रसेनजीत रणीत आणि ईशा बाबरा यांनी केले तर आभार सोनिया अय्यंगार यांनी मानले.

## राजेंद्र पवार यांचे शेती आणि शेतकरी समर्पित कार्य प्रेरणादायी : केंद्रीय मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

नागपूर (दै. संध्या) :



शेतकऱ्यांपर्यंत अत्याधुनिक शेती तंत्र पोहोचविण्याचे,विविध नवनवीन आणि यशस्वी प्रयोगांशी शेतकऱ्यांना अवगत करणे या कार्यामधून राजेंद्र पवार यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आपली कटिबद्धता सिद्ध केली आहे,या शब्दांत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना.श्री. नितीन गडकरी यांनी राजेंद्र पवार यांचा गौरव केला.

कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा 'डॉ. सी.डी. मायी कृषीतज्ज्ञ' पुरस्कार बारामती येथील ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार यांना ना.श्री.नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नितीन पाटील,ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ डॉ.सी.डी.मायी,ज्येष्ठ कृषी पत्रकार सुधीर भोंगळे,कृषी विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश गांधी, श्रीराम काळे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

ना.श्री.गडकरी म्हणाले, 'राजेंद्र पवार यांचे कृषी क्षेत्रातील कार्य आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे डॉ.सी.डी.मायी यांच्या नावाने असलेला पुरस्कार त्यांना मिळत असल्याचा मनापासून आनंद आहे.डॉ.मायी शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने कार्य करीत आहेत. सरकारी नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांचे कार्य सुरू आहे,ही आदर्श बाब आहे. त्यांच्याच प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात नर्सरी कायदा आला.'

शेतीमध्ये जमीन हा महत्त्वाचा घटक आहे.दर्जेदार उत्पादनासाठी माती परीक्षण आवश्यक आहे. पाण्याच्या संदर्भात काम करण्याची गरज आहे.ठिबक सिंचन,ड्रोनद्वारे फवारणी हेही घटक शेतीमध्ये महत्त्वपूर्ण ठरत आहेत.या सर्व तंत्रांचा वापर शेतीमध्ये केला तरच एकरी उत्पन्न वाढेल आणि शेतकरी समृद्ध होईल.राजेंद्र पवार आणि त्यांचे ट्रस्ट यासंदर्भात सातत्याने शेतकऱ्यांचे मार्गदर्शन करीत आहे, ही समाधानाची बाब आहे,असेही ना.श्री.गडकरी म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभदा फडणवीस यांनी केले.

## डॉक्टर हल्ला प्रकरणी पुकरलेला संप तूर्तास मागे

नवी दिल्ली (दै. संध्या) :

पिंपरी (प्रतिनिधी) डोंबिवली येथील डॉक्टर आणि नर्सेसवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोशिएशन पिंपरी चिंचवड भोसरी शाखेच्या वतीने पुकारण्यात आला होता. माननीय उच्च न्यायालयाने आयएमए आणि सर्व डॉक्टरांच्या संघटनांना २० जुलै २०२६ रोजी नियोजित संप मागे घेण्याचे आवाहन केले आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आवाहनाचा मान राखून हा संप तात्पुरता स्थगित करण्यात आला आहे. दि. २० रोजी एकदिवसीय राज्यव्यापी संप पुकारण्यात आला होता. तो तूर्तास स्थगित करण्यात आला असल्याची माहिती अध्यक्ष डॉ सुधीर भालेराव, सचिव डॉ विकास मंडलेचा,उपाध्यक्ष डॉ मिलिंद सोनावणे, डॉ अनिरुद्ध टोणगावकर, डॉ. सुहास लुंकड, डॉ. मंदार डोईफोडे यांनी दिली आहे. दि २० रोजी सकाळी ६ वाजे पासून ते दि.२१ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत दिवसभरात बाह्य रुग्ण सेवा बंद राहणार होती.

डोंबिवली येथील एका नगरसेवकाने केलेल्या डॉक्टरांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ तसेच महाराष्ट्र आरोग्य सेवा संरक्षण कायदा 2010 या कायद्यात बदल करून तो अधिक सशक्त व परिणामकारक आणि अजामीनपात्र करण्याची देखील मागणी तसेच इतर काही मागण्या अजून प्रलंबित आहेत त्या करता संप पुकारण्यात आला होता.

## पुण्यात शनिवारी उत्साहात पार पडला 'संयम ऑलिंपियाड २०२५-२६' सन्मान सोहळा

पुणे (दै. संध्या) :

विद्यार्थ्यांमध्ये व्यसन प्रतिबंधाविषयी सजगता, जबाबदारीची भावना आणि योग्य निर्णय घेण्याची तयारी वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या 'संयम ऑलिंपियाड २०२५-२६' या उपक्रमाचा सन्मान सोहळा शनिवारी गांधी भवन, कोथरूड, पुणे येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात संयम ऑलिंपियाडमध्ये उल्लेखनीय सहभाग नोंदविणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला मा. श्री. अरुण जाधव उपसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. डॉ. मनोरमा आवारे (प्रकल्प अधिकारी, समग्र शिक्षा अभियान), मा. नंदकिशोर राठी (विश्वस्त, ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्ट), रेश्मा कचरे (परिवर्तन ट्रस्ट) तसेच श्री. प्रफुल्ल शशिकांत (संचालक, वोवेल्स ऑफ द पीपल असोसिएशन) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

'संयम ऑलिंपियाड २०२५-२६' हा शाळा-आधारित, कृतीयुक्त आणि तंत्रज्ञान-सहाय्यित व्यसन प्रतिबंध उपक्रम आहे. विद्यार्थ्यांना तंबाखू, दारू, अंमली पदार्थ, मोबाईल व गेमिंग सवयी, मित्रांचा दबाव, नकार देण्याची क्षमता आणि जबाबदार निर्णय या विषयांवर विचार करण्याची संधी देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), पुणे, पुणे महानगरपालिका, वोवेल्स ऑफ द पीपल असोसिएशन आणि परिवर्तन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्ट यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला.

यंदाच्या उपक्रमात२१३ शाळांनी सहभाग नोंदविला, ९,००० हून अधिक विद्यार्थी संयमशी जोडले गेले, तर १,४०० हून अधिक शालेय उपक्रमांची डिजिटल नोंद करण्यात आली. या प्रक्रियेनंतर ६८ शाळा संयम ऑलिंपियाड परीक्षेसाठी पात्र ठरल्या. विद्यार्थ्यांनी पोस्टर स्पर्धा, गटचर्चा, भूमिकानाट्य, पथनाट्य,



प्रतिज्ञा, जनजागृती रॅली आणि विविध कृतीप्रधान उपक्रमांद्वारे सक्रिय सहभाग नोंदविला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी व्यसन आणि आपण, तंबाखू, दारू, अंमली पदार्थ, मोबाईल व गेमिंग सवयी आणि व्यसनाला 'नाही' म्हणण्याची क्षमता या सहा विषयांवर काम केले. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना केवळ माहिती देण्याऐवजी चर्चा, कृती, चिंतन आणि सहभागाच्या माध्यमातून स्वतःच्या सवयी, मित्रांचा दबाव आणि रोजच्या निर्णयांबद्दल विचार करण्याची संधी मिळाली.

वाढत्या व्यसनसंबंधित जोखमींच्या पार्श्वभूमीवर शालेय स्तरावर प्रतिबंधात्मक शिक्षणाची गरज लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसन प्रतिबंधाविषयी जाणीव, चिकित्सक विचार, स्वतःच्या सवयींकडे पाहण्याची दृष्टी आणि जबाबदार निर्णय घेण्याची तयारी यांना चालना मिळाली. विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक, पालक आणि शाळा समुदायामध्येही या विषयावर सकारात्मक संवाद सुरू करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांमध्ये जीवनकौशल्ये, मूल्याधिष्ठित शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि जबाबदार निर्णयक्षमता विकसित करण्यासाठी शाळा-आधारित उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. केवळ माहिती देणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांना विचार करण्याची, योग्य निवड करण्याची आणि आवश्यक तेव्हा ठामपणे 'नाही' म्हणण्याची तयारी देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात संयम ऑलिंपियाडमध्ये उल्लेखनीय सहभाग नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा आणि शाळांचा सन्मान करण्यात आला. तसेच संयम उपक्रम प्रभावीपणे राबविणाऱ्या शाळांचा विशेष गौरव करण्यात आला. सोहळ्यात हुजूरपागा प्रायमरी स्कूल यांना उत्कृष्ट शाळा म्हणून, ओम संदीप दळवी (ज्ञानदा प्रशाला, किरकटवाडी) यांना उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून आणि प्रिया गोगावले (हुजूरपागा प्रायमरी स्कूल) यांना उत्कृष्ट मार्गदर्शक / शिक्षक म्हणून गौरविण्यात आले.


### महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला पुणे- ४११ ००१ यांचे कार्यालय

ई मेल पत्ता - northpune.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२३३०५

**ई-निविदा सूचना क्रमांक १३ सन २०२६-२०२७ (ऑनलाईन)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे ४११००१ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२३३०५) हे सक्षम कंत्राटदार जे निवेदतील अटी व शर्तीची पूर्तता करतील अशा कंत्राटदारांकडून खालील कामांची "ब-१" नमुन्यातील निविदा ई प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर htpp://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| काम क्रं. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष |
|---|---|---|
| १ | पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील संभाव्य दरड प्रवण गाव मौजे पसारवाडी (माळीण) येथील सर्वे क्र. ३४१,३४२,३४३,३४४,३४५ व ३४६ अंतर्गत प्रस्तावीत घरांच्या जागेची सुधारणा करणे ता. आंबेगाव जि.पुणे. | रु. १,३३,६४,९१४/- |
| २ | पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील संभाव्य दरड प्रवण गाव मौजे पांचाळे खुर्द येथील सर्वे क्र.३२/०१/ब (पार्ट) आणि ३३ मधील प्रस्तावीत घरांच्या जागेची सुधारणा करणे ता. आंबेगाव जि. पुणे | रु. १,५१,२८,३०९/- |
| ३ | पुणे जिल्ह्यातील आंबेगांव तालुक्यातील संभाव्य दरडप्रवण गांव मौजे जांभोरी अंतर्गत काळवाडी-२ येथील गट क्र ३१५ मधील प्रस्तावित घरांच्या जागेची सुधारणा करणे ता. आंबेगांव जि. पुणे | रु. ६४,१६,४७५/- |

ई निविदेचे वेळापत्रक

| अ. क्रं. | टप्पा | पासून दिनांक व वेळ | पर्यंत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई निविदा ऑनलाईन विक्री व सादर करण्याचा कालावधी | दि.२०.७.२०२६ सकाळी १०.०० पासून | दि. २७.०७.२०२६ संध्याकाळी १८.१५ वाजेपर्यंत |
| २ | ई निविदा पूर्व चर्चा बैठकीचे ठिकाण, दिनांक व वेळ | दिनांक २२.०७.२०२६ रोजी दुपारी १५.०० वा. मा. अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे -१ | |
| ३ | तांत्रिक व आर्थिक ई निविदा ऑनलाईन उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, पुणे यांचे कार्यालयात दिनांक २९.०७.२०२६ रोजी सकाळी ११.०० पासून (शक्य झाल्यास) | |

संकेतस्थळावर ई- निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सूचना)

२) htpp://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे कार्यालयातील सूचना फलक
(टिप - वरील कामाबाबत कंत्राटदाराची निविदोत्तर पात्रता अजमावण्यात येणार आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम
(उत्तर) विभाग,
पुणे ४११ ००१

क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C१७८०



## फिजिक्सवाला ने नीट 2026 मधील विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा उत्सव साजरा केला

नवी दिल्ली (दै. संध्या) :

एज्युकेशन कंपनी फिजिक्सवाला ने नीट 2026 चे निकाल जाहीर केले असून अनेक विद्यार्थ्यांनी नीट ऑल इंडिया रँक मध्ये उच्च स्थान मिळवले आहे.

रविकांत दिवाकर, शिवांश आनंद, दिव्यांश जायसवाल आणि साक्षी कुमारी हे काही उच्च कामगिरी करणारे विद्यार्थी आहेत. ही कामगिरी फिजिक्सवाला ने दिलेल्या लवचिक शिक्षण पद्धतीचे उदाहरण आहे. विद्यार्थ्यांनी आपापल्या आवडीनुसार आणि शिकण्याच्या पद्धतीनुसार ऑनलाइन कोर्सेस किंवा ऑफलाइन, टेक-सक्षम फिजिक्सवाला विद्यापीठ केंद्रांमधून शिकून उच्च गुण मिळवले.

याशिवाय, पुणे येथे विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करण्यासाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन



करण्यात आले. आयुष राज हे शहरातील फिजिक्सवाला चे उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी एक होते.

"माझ्या मेहनतीचे फळ मिळाले याचा मला खूप आनंद आहे, रविकांत दिवाकर म्हणाले, "माझ्या मेहनतीचे फळ मिळाले याचा मला खूप आनंद आहे. फिजिक्सवाला च्या बॅचेसनी माझे सर्व संभ्रम दूर केले. शिक्षकांनी कॉन्सेप्ट्स इतक्या स्पष्टपणे समजावून सांगितले की मला फॉर्म्युलामागचा लॉजिक खरोखर समजला, फक्त पाठांतर नाही. कठीण प्रश्नात अडकलो की व्हिडिओ एक्स्प्लेनेशनने लगेच योग्य स्टेप्स दाखवल्या, ज्यामुळे माझा बराच वेळ वाचला."

"शिवांश आनंद म्हणाले, हा स्कोर मिळाल्याचा आनंद खूप आहे, आणि माझ्या मेहनतीचे फळ मिळाले याचा मला समाधान आहे." माझ्यासाठी सर्वात मोठी मदत म्हणजे डेली प्रॅक्टिस पेपर्स. त्या नियमित टेस्ट्सनी मला वेळेचे नियोजन कसे करायचे आणि घाबरायचे नाही हे शिकवले. शिक्षकांनी माझ्या शंका दूर केल्या आणि मी कुठे चुका करत होतो ते दाखवले, ज्यामुळे मी त्या खऱ्या परीक्षेपूर्वीच सुधारू शकलो."


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### ई-निविदा सूचना
### वाहने भाडयाने पाहिजेत

कार्यकारी अभियंता, महावितरण, पर्वती विभाग, पुणे कार्यालयांतर्गत वाहन भाडे तत्वावर घेण्यासाठी खालीलप्रमाणे ई-निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र. | कामाचा तपशील | बयाणा रक्कम |
|---|---|---|
| EE/PRD/Vehicle/ T-01/2026-27 | कार्यकारी अभियंता, पर्वती विभाग, पुणे यांच्यासाठी वाहन. | रू.१२०६०/- |
| EE/PRD/Vehicle/ T-02/2026-27 | अतिरिक्त कार्यकारी अभियंता, वडगाव उपविभाग यांच्यासाठी वाहन. | रू.१२०६०/- |
| EE/PRD/Vehicle/ T-03/2026-27 | अतिरिक्त कार्यकारी अभियंता, पेशवेपार्क उपविभाग यांच्यासाठी वाहन. | रू.१२०६०/- |
| EE/PRD/Vehicle/ T-04/2026-27 | अतिरिक्त कार्यकारी अभियंता, स्वारगेट उपविभाग यांच्यासाठी वाहन. | रू.१२०६०/- |
| EE/PRD/Vehicle/ T-05/2026-27 | अतिरिक्त कार्यकारी अभियंता, नांदेडसिटी उपविभाग यांच्यासाठी वाहन. | रू.१२०६०/- |

वरिल निविदा महावितरण कंपनीच्या **https.//etender.mahadiscom.in/eatApp/** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि.२१.०७.२०२६ ते २७.०७.२०२६ रोजी २३.५५ वाजेपर्यंत उपलब्ध राहतील. तसेच निविदा प्रक्रियेत होणारे बदल किंवा मुदतवाढीची माहिती महावितरणच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रकाशित केली जाईल. संपर्क क्र. ७८७५७६७१८७

**पी.आर.ओ.नं.PZ/087/2026-27**

**कार्यकारी अभियंता, पर्वती विभाग, पुणे**



महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पुणे विद्युत विभाग पुणे, यांचे कार्यालय

१ ला मजला, नविन मध्यवर्ती इमारत (विस्तारीत), पुणे - ४११००१

दूरध्वनी : ०२०-२६१२६२५८ email: elpune.ee@mahapwd.gov.in

**ई- निविदा सुचना क्र. ०६ / २०२६-२०२७**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम पुणे विद्युत विभाग पुणे हे B-1 (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे ऑनलाइन मागवित असून कंत्राटदाराचे वर्गाविषयीची माहिती निविदेत नमूद करण्यात आली आहे. निविदा कागदपत्रे शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाउनलोड करण्यात यावी तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पुणे विद्युत विभाग, पुणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

कामाचे नाव :- निविदेत एकूण ०४ कामे आहे.

१. निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २४/०७/२०२६ ते दिनांक ३१/०७/२०२६

२. निविदा पुर्व बैठक व स्थळ : निरंक

३. ई-निविदा उघडणे : दिनांक ०३/०८/२०२६ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पुणे विद्युत विभाग पुणे, यांचे कार्यालय १ ला मजला, नविन मध्यवर्ती इमारत (विस्तारीत), पुणे - ४११००१.

४. खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.

www.mahatenders.gov.in

सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.

प्रसिध्दीकरिता तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पुणे विद्युत विभाग, पुणे या कार्यालयाचे सूचना फलक

विमाका/पुणे/जाहिरात/८४/२०२६-२७

सही/-
(शितलकुमार मुंढे)
कार्यकारी अभियंता
सा.बां. पुणे विद्युत विभाग, पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बिजलीनगर येथे मटका जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; चौंघांविरोधात गुन्हा दाखल

पिंपरी (दैनिक संध्या) : बिजलीनगर येथे सुरू असलेल्या मटका जुगार अड्ड्यावर गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून चार जणांविरोधात कारवाई केली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ जुलै रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास सरसेनापती बिपीन रावत भुयारी मार्गाशेजारी, नागसेननगर झोपडपट्टी परिसर, बिजली नगर, चिंचवड येथे ही कारवाई करण्यात आली. आरोपी विनापरवाना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी नागरिकांकडून पैसे स्वीकारून मुंबई व कल्याण नावाचा मटका जुगार चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या कारवाईत सचिन ज्ञानोबा काळे (वय २५, चाफेकर चौक वेताळ नगर), महेश रमेश शहा (वय ४८, गुरुनानक कॉलनी, रहाटणी), शंकर सदाशिव मिसाळ (वय ३९, गुरुद्वारा चौक बिजलीनगर) आणि एक अशा चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. छाप्यादरम्यान पोलिसांनी जुगाराच्या साहित्यांसह रोख रक्कम असा एकूण ३२ हजार ३१० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी गुन्हे शाखेचे पोलिस हवालदार शिवराम भोपे यांनी फिर्याद दिली असून पुढील तपास सुरू आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून शहरातील बेकायदेशीर जुगार व्यवसायांवर कारवाईची मोहीम सुरू असून अशा प्रकारच्या अवैध धंद्यांविरोधात कठोर पावले उचलली जात असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

### महिलांच्या आरोग्याचा इशारा! 40 टक्के महिला-तरुणी पीसीओएसच्या विळख्यात

पिंपरी (दैनिक संध्या) : बदलत्या जीवनशैलीचा परिणाम प्रत्येक वयोगटातील महिलांच्या आरोग्यावर होत आहे. त्यामुळे महिलांसह तरुणींमध्ये पीसीओडीएसचा धोका वाढला आहे. पिंपरी-चिंचवड शहरात ४० टक्के महिला व तरुणी पीसीओएसने (पॉलिसिस्टिक ओव्हरिज सिंड्रोम) त्रस्त असल्याचे समोर आले आहे. १८ ते ३० वयोगटातील मुली, महिलांमध्ये हे प्रमाण आधिक असल्याचे स्त्रीरोग तज्ज्ञांचे म्हणणे आहे. बैठी जीवनशैली, अनियमित व चुकीच्या आहाराच्या सवयी, वाढलेला ताणतणाव, व्यायामाचा अभाव, हार्मोन्समध्ये झालेला बदल आणि अनुवंशिकता अशा विविध कारणांमुळे युवतींमध्ये अनियमित मासिक पाळीच्या समस्येत वाढ झाली आहे. यामुळे स्थूलत्व, ओव्होलेशनवर परिणाम झाल्याने लवकर गर्भधारणा न होणे, गर्भपात होणे, गरोदरपणात मधुमेह समस्येचा त्रास होणे यासारख्या समस्या उदभवतात. शहरात पीसीओडीसह पीसीओएसग्रस्त युवतींचे प्रमाणही वाढल्याचे स्त्रीरोग तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे. या आजाराने त्रस्त महिलांना वंध्यत्व, हायपरलिडिमिया, हृदयविकार तसेच हायपरटेन्शन हे विकार होण्याचा धोका असतो. पीसीओएसने ग्रासलेल्या स्त्रियांमध्ये वंध्यत्वाचा दर जास्त असतो. कारण, त्यामुळे अनियमित ओव्हलेशन होते किंवा होत नाही.

### पवना 77% भरले, तरी पिंपरी-चिंचवडकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार!

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या आठवड्यात जोरदार पाऊस होऊन पवना आणि इंद्रायणी नदीस पूर आला होता. तसेच, पवना धरण 77 टक्के भरले आहे. असे असतानाही शहरात सुरू असलेली 15 टक्के पाणी कपात यापुढेही सुरूच राहणार असल्याने प्रशासनाने जाहीर केले आहे. जून महिना संपला तरी, पावसाळा सुरू न झाल्याने तसेच, शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणात केवळ 16 टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने 15 टक्के पाणी कपात सुरू केली होती. ती कपात शहरात 19 जूनपासून सुरू करण्यात आली होती. त्यामुळे शहरात नेहमीपेक्षा अर्धा ते एक तासाने पाणी कमी सोडण्यात येत आहे. त्यामुळे शहरातील अनेक भागांत पाणीटंचाईचा सामना करावा लागला. मात्र, जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून पावसाने जोरदार हजेरी लावली. पाच व सहा जुलैला झालेल्या धुवाधार पावसामुळे पवना आणि इंद्रायणी नदीस पूर येऊन अनेकांच्या घरात तसेच, हाऊसिंग सोसायट्यांत पाणी शिरले. पवना धरणात अल्पावधीतच तब्बल 77.28 टक्के भरले आहे. त्यामुळे पाणी कपात रद्द होईल, अशी शहरवासीयांना आशा होती. मात्र, एल निनोचा प्रभाव कमी झाला नसून, पाण्याचे आतापासूनच नियोजन करून काटकसरीने पाण्याचा वापर करण्याची सूचना जलसंपदा विभागाने महापालिकेस केली आहे. तसेच, पाणी कपात कायम ठेवण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे महापालिकेने पाणी कपात मागे घेतलेली नाही.



# रावेत-नऱ्हे 'डीपीआर'ला केंद्रीय मंत्री गडकरींचा हिरवा कंदील

## पिंपरी चिंचवड शहराच्या वाहतूक सक्षमीकरणाच्या दृष्टीने पुढचे पाऊल! - आमदार शंकर जगतापांच्या पाठपुराव्याला यश

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड आणि हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आमदार शंकर जगताप यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. रावेत ते नऱ्हे या 32 किलोमीटरच्या एलिव्हेटेड कॉरिडॉरसाठी सुमारे सहा हजार कोटी रुपयांच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) मंजूर केला असून लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले असल्याची माहिती आमदार जगताप यांनी शनिवारी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (दि 18) पुणे येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासमवेत पुणे-शिरुर उन्नत द्रुतगती महामार्ग, तळेगाव-चाकण-शिक्रापूर उन्नत महामार्ग आणि हडपसर-यवत उन्नत महामार्गांचे भूमिपूजन केले यावेळी या कार्यक्रमात नितीन गडकरी यांनी ही माहिती दिली.





आमदार शंकर जगताप याबाबत म्हणाले, पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील वाढती वाहतूक, हिंजवडी आयटी पार्ककडे जाणाऱ्या वाहनांची संख्या आणि पिंपरी-चिंचवड शहराचा वेगाने होणारा विस्तार यामुळे रावेत ते नऱ्हे हा एलिव्हेटेड कॉरिडॉर तातडीने मंजूर करावा, अशी आग्रही मागणी 23 मार्च 2026 रोजी हिवाळी अधिवेशनात केली होती. तसेच राज्य आणि केंद्र सरकारकडे या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. आज या कामावर शिक्कामोर्तब झाले असून लवकरच कामाला सुरुवात होईल. यातून वाहतूक सक्षमीकरणाच्या दृष्टीने पिंपरी चिंचवडकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.

> पिंपरी-चिंचवड आणि हिंजवडी परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न अधिवेशनात ठामपणे मांडला होता. त्यानंतर केंद्र आणि राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश मिळाले असून रावेत-नऱ्हे एलिव्हेटेड कॉरिडॉर शहराच्या भविष्यातील सक्षम वाहतूक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग ठरेल.
>
> - शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ

या रस्त्यामुळे वाकड, ताथवडे, पुनावळे, रावेत, किवळे तसेच बालेवाडी, बाणेर, सुस आणि बावधन परिसरातील वाहतुकीला मोठा दिलासा मिळणार आहे. हिंजवडी आयटी पार्ककडे ये-जा करणाऱ्या वाहनांचा प्रवास अधिक गतिमान होऊन दैनंदिन वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. याशिवाय माण, मारुंजी, नेरे, जांबे आणि कासारसाई परिसरातील नागरिकांनाही या प्रकल्पाचा थेट लाभ मिळेल. मुंबई-बंगळूर महामार्गावरील वाहनांचा वेग वाढण्याबरोबरच प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार असल्याचा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला आहे.

राज्य आणि केंद्र सरकारच्या समन्वयातून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रत्यक्षात येत आहे. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून कॉरिडॉरच्या कामाला लवकरच सुरुवात होणार असल्याचे आमदार जगताप यांनी सांगितले.

## रावेत पोलिसांकडून दोन फरार आरोपींना अटक; दोन पिस्तुल, १५ जिवंत काडतुसे जप्त

पिंपरी (दै. संध्या)

रावेत पोलिसांनी गंभीर गुन्ह्यातील दोन फरार आरोपींना अटक करून त्यांच्याकडून दोन देशी बनावटीची पिस्तुले, १५ जिवंत काडतुसे, एक चारचाकी वाहन असा एकूण ११ लाख ६२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रावेत पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी विनोद निजप्पा गायकवाड (३५, रा. रमाबाईनगर, रावेत) आणि अक्षय प्रभाकर साबळे (रा. काळभोरनगर, आकुर्डी) हे गुन्ह्यानंतर फरार झाले होते. त्यांच्या शोधासाठी विशेष पथक तयार करण्यात आले होते. गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी जाधववस्ती, रावेत परिसरातून दोघांना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान आरोपींकडून दोन देशी बनावटीची पिस्तुले, १५ जिवंत काडतुसे आणि वापरातील कार जप्त करण्यात आली.



ही कारवाई पोलिस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली रावेत पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक. हृषीकेश घाडगे, पोलिस उपनिरीक्षक राहुल खिळे यांच्या तपास पथकाने केली. तपास सुरू असून आरोपींकडून आणखी गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये ३५० नाल्यांवरील अतिक्रमणे हटणार; नाले बुजवणाऱ्यांवर महापालिकेचा कारवाईचा बडगा

पिंपरी (दै. संध्या)

यंदा पहिल्याच पावसामध्ये जुलैच्या सुरुवातीलाच पिंपरी-चिंचवड शहरातील नाले तुंबले होते. त्यामुळे नाले अरुंद करणाऱ्यांवर तसेच, बुजवणाऱ्यांवर महापालिकेच्या वतीने धडक कारवाई केली जाणार आहे. शहरातील साडेतीनशेवर नाल्यांचा प्रवाह खुला केला जाणार आहे.

मुसळधार पावसामुळे मोशी येथील कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. तर, काही जण जखमी झाले. त्याचदरम्यान या पावसामध्ये शहर परिसरातील पावसाळी गटारे, अनेक ठिकाणी नाले तुंबले होते. पवना आणि इंद्रायणी नदीला पूर आल्याने नदीकाठच्या परिसरामध्ये सांडपाणी आणि पावसाळी गटारे वाहून जाणाऱ्या वाहिन्यांमध्ये पाणी घुसले होते.



हे पाणी नागरी भागामध्ये शिरले. गावांचे रूपांतर उपनगरात आणि उपनगरांचे रूपांतर आता स्मार्ट सिटीत झाले आहे. पवना, मुळा आणि इंद्रायणी या तीन नद्यांच्या तीरांवर शहर वसले आहे. त्यामुळे उपनगरातील पाणी नद्यांकडे वाहून जाते. नैसर्गिक प्रवाह निर्माण होऊन नाले तयार झाले. शहरीकरणामध्ये यामधील अनेक नाले बांधकाम व्यवसायिकांनी गायब केले आहेत. त्या ठिकाणी टोलेजंग गृहप्रकल्प उभारण्यात आले आहेत. काही ठिकाणी नाले अरुंद करण्यात आले आहेत. काही ठिकाणी त्यावर बांधकामे कण्यात आली आहेत.

## पिंपरी चिंचवड मध्ये ठेकेदाराच्या माध्यमातून शालेय साहित्य खरेदी करण्याचा घाट का घालता जात आहे - रविराज काळे

पिंपरी (दै. संध्या)

पुणे महानगरपालिकेच्या शाळेतील 59795 विद्यार्थ्यांना शालेय साहित्य घेण्यासाठी DBT द्वारे 22.98 कोटी थेट विद्यार्थी यांच्या खात्यावर जमा करण्यात आले.. पण पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील शाळा सुरू होऊन 1 महिना पूर्ण झाला तरी येथील विद्यार्थी यांना अजूनही शालेय साहित्य देण्यात PCMC अपयशी का ठरली आहे.

आयुक्त विजय सूर्यवंशी यांना विद्यार्थी यांच्या भवितव्याच्या विचार नाही आहे का ? का अजूनही ठेकेदाराच्या माध्यमातून साहित्य खरेदी करण्यासाठी आयुक्त अग्रेसर आहेत. यात काही आर्थिक हितसंबंध तर नाही ना किंवा आयुक्त यांच्यावर कोणाचा दबाव आहे हे समजून येत नाही. दिनांक ६ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णय नुसार योजनांतील भष्टाचार आणि ठेकेदारी कामातील रिंग पद्धत रोखण्यासाठी थेट लाभार्थींच्या खात्यात पैसे जमा करण्याचे आदेश ५ डिसेंबर २०१६ ला सर्व शासकीय संस्था यांना दिले होते तरी PCMC आयुक्त या आदेशाचे पालन का करत नाही ?




पुणे महानगरपालिका शहरातील विद्यार्थी यांच्या खात्यावर डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फर करते तर पिंपरी मध्ये ठेकेदाराच्या माध्यमातून साहित्य खरेदी करण्याचा घाट का घालता जात आहे. आयुक्त साहेब आपणास विनंती आहे.

ठेकेदारी पध्द्तीत लक्ष घालण्यापेक्षा विद्यार्थी ह्यांच्या हिताकडे आपण लक्ष द्यायला हवे होते.. आपण एक जबाबदार अधिकारी आहेत आपण शासनाच्या आदेशाचे पालन करायचे सोडून ठेकेदारी मध्ये लक्ष का घालत आहेत.

आपली विद्यार्थी यांच्या प्रती संवेदनशीलता संपली आहे का ? आपण लवकरात लवकर DBT द्वारे शालेय साहित्य लवकरात लवकर खरेदी करण्यावर भर द्यावा व आता काढण्यात आलेली साहित्य खरेदीची निविदा रद्द करावी. अन्यथा येत्या काही दिवसांत पिंपरी चिंचवड महापालिका समोर आम्ही तीव्र स्वरूपाचे आंदोलन करू असा इशारा आप युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रविराज काळे यांनी दिला.

## डॉक्टरांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ आज वैद्यकीय सेवा बंद; आयएमएचा राज्यव्यापी संप

पिंपरी (दै. संध्या)

डोंबिवली येथील एका रुग्णालयात डॉक्टर व परिचारिकांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशन पिंपरी-चिंचवड भोसरी शाखेच्या वतीने सोमवारी (दि.२०) एकदिवसीय राज्यव्यापी संप पुकारण्यात आला आहे. या संपामुळे सकाळी ६ वाजल्यापासून मंगळवारी सकाळी ६ वाजेपर्यंत बाह्यरुग्ण विभाग सेवा बंद राहणार असल्याची माहिती आयएमएच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

आयएमए पिंपरी-चिंचवड भोसरी शाखेचे अध्यक्ष डॉ. सुधीर भालेराव, सचिव डॉ. विकास मंडलेचा, उपाध्यक्ष डॉ. मिलिंद सोनावणे, डॉ. अनिरुद्ध टोणगावकर, डॉ. सुहास लुंकड आणि डॉ. मंदार डोईफोडे यांनी याबाबत माहिती दिली. मात्र, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, प्रसूती सेवा तसेच अतितातडीच्या उपचार सेवा नियमित सुरू राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. डोंबिवली येथे झालेल्या घटनेचा निषेध व्यक्त करताना आयएमएने डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवरील वाढत्या हल्ल्यांबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. डॉक्टर हा केवळ व्यवसाय करणारा व्यक्ती नसून रुग्णांसाठी आशेचा किरण असतो.

जीव वाचवण्यासाठी दिवस-रात्र झटणाऱ्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले ही गंभीर बाब असून अशा घटनांमुळे संपूर्ण आरोग्य व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असल्याचे संघटनेने म्हटले आहे. रुग्णालये ही उपचार व सेवेसाठीची ठिकाणे असून ती संघर्षाची केंद्रे बनू नयेत, अशी भूमिका आयएमएने मांडली. उपचारादरम्यान अनपेक्षित घटना घडल्यास किंवा रुग्णाचा मृत्यू झाल्यास संतप्त प्रतिक्रिया उमटू शकतात, मात्र हिंसक मार्ग स्वीकारणे कोणत्याही परिस्थितीत योग्य नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

# बालाजीनगर एसआरए प्रकल्पात ५०० चौ. फूट घरांसह सर्व आधुनिक सुविधा द्या : शंकर कुऱ्हाडे

पिंपरी (दै. संध्या)

बालाजीनगर, भोसरी येथील प्रस्तावित झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) प्रकल्पात प्रत्येक पात्र झोपडीधारकाला किमान ५०० चौ. फूट क्षेत्रफळाचे घर, कोणालाही अन्यायकारकपणे अपात्र न ठरविणे, संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे राबविणे आणि आधुनिक नागरी सुविधांनी युक्त आदर्श पुनर्वसन प्रकल्प उभारण्याची मागणी करत बालाजीनगरमधील रहिवाशांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे. अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते शंकर विठ्ठल कुऱ्हाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच हे निवेदन बालाजीनगर रहिवाशांच्या वतीने मुख्यमंत्र्याना देण्यात आले असल्याचेही कुऱ्हाडे सांगितले आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शंकर कुऱ्हाडे, महावीर बनसोडे, प्रशांत बचुटे, बी. बी. शिंदे, दिनेश कुऱ्हाडे, लक्ष्मण शिरसाठ, जावेद शहा, मनिषा वाघमारे, राणी मांडगे, सुभाष बनसोडे आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, एसआरए योजनेचा मूळ उद्देश झोपडपट्टीतील नागरिकांना सुरक्षित, सन्मानजनक आणि आधुनिक सुविधांसह जीवनमान उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र अनेक प्रकल्पांमध्ये पात्र नागरिकांवर अन्याय होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असल्याने शासनाने कठोर, लोकहिताचे आणि पारदर्शक निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे. शहराच्या विकासात झोपडपट्टीतील कष्टकरी नागरिकांचे मोठे योगदान असून त्यांच्या पुनर्वसनात कोणत्याही प्रकारचा भेदभाव होऊ नये, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. रहिवाशांनी प्रत्येक पात्र झोपडीधारकाला किमान ५०० चौ. फूट सुसज्ज घर देण्याची मागणी केली आहे. वाढत्या कुटुंबाच्या गरजा लक्षात घेता सध्याचे कमी क्षेत्रफळ अपुरे असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तसेच कोणालाही तांत्रिक कारणे किंवा मनमानी निकषांच्या आधारे अपात्र ठरवू नये आणि प्रत्येक पात्र कुटुंबाला पुनर्वसनाचा समान लाभ मिळावा, अशी भूमिका मांडण्यात आली आहे.

निवेदनात बालाजीनगरमधील सर्व इमारती सात मजली स्वरूपात उभारण्यात याव्यात, जेणेकरून सर्व पात्र नागरिकांचे पुनर्वसन त्याच परिसरात होईल, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रकल्पात २४ तास पाणीपुरवठा, नियमित वीज, स्वच्छता, आधुनिक जलनिस्सारण व्यवस्था, सीसीटीव्ही सुरक्षा, अग्निसुरक्षा, लिफ्ट, दिव्यांगांसाठी सुविधा, वाहनतळ, हिरवळ, मुलांसाठी खेळाची मैदाने, क्रीडांगण, उद्याने, उच्च दर्जाच्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा, सरकारी रुग्णालय, डिजिटल लायब्ररी, अभ्यासिका, ज्येष्ठ नागरिक केंद्र, सर्वधर्मीय प्रार्थनास्थळे आणि सुसज्ज सभागृह उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.



याशिवाय विकासकाने प्रत्येक नागरिकाशी मराठी भाषेत स्पष्ट लेखी करार करावा, अधिकृत सार्वजनिक सभा घेऊन सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत, पात्रता यादी तात्काळ प्रसिद्ध करावी, प्रकल्पाचा संपूर्ण आराखडा, घराचा आकार, घर भाडे, बांधकामाचा कालावधी आणि ताबा देण्याची प्रक्रिया नागरिकांसमोर पारदर्शकपणे मांडावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांवर दबाव, धमकी किंवा दिशाभूल करून संमती घेतली जात असल्याच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करावी, पुनर्वसनाच्या कालावधीत शासनमान्य भाडे वेळेवर मिळावे, नागरिकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र हेल्पडेस्क किंवा नोडल अधिकारी नियुक्त करावा तसेच एसआरए प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याची माहिती आणि बैठकींचे इतिवृत्त सार्वजनिक करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागण्यांचा सकारात्मक विचार करून तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आम्हाला न्याय न मिळाल्यास बालाजीनगरमधील रहिवासी व्यापक जनआंदोलन उभारतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी तसेच पुणे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### इस्कॉनच्या श्री जगन्नाथ रथयात्रा महोत्सवात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची उपस्थिती

बारामती (दैनिक संध्या) : आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन), बारामती आयोजित श्री जगन्नाथ रथयात्रा महोत्सवात महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांनी उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी उपस्थित भाविक, पदाधिकारी व नागरिकांशी मनमोकळा संवाद साधत रथयात्रेच्या आयोजनासाठी शुभेच्छा दिल्या. शभक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमात सुनेत्रावहिनी पवार यांनी सर्वांना भगवान श्री जगन्नाथांचे आशीर्वाद लाभावेत, अशी सदिच्छा व्यक्त केली.



### स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त साफसफाई कामगारांना रेनकोटचे वाटप

बारामती (दैनिक संध्या) : दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या पहिल्या जयंती निमित्ताने जय जवान गणेश मंडळ यांच्या वतीने बारामती नगर पालिका साफसफाई करणारे महिलांना मोफत साड्या तर पुरुषांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. बारामती संत तुकाराम महाराज आणि संत सोपानकाका महाराज यांची पालखी येते,या काळात बारामती शहरातील साफसफाईचे तातडीने महत्वपूर्ण काम या महिला आणि पुरुष कामगार करतात, याबाबतची दखल घेऊन जयजवान गणेश मंडळच्या वतीने निलेश तावरे, शंभूशेठ आगवणे, सज्जन शिंदे, विलास व्हाटकर, ओंकार ढोले, कैलास साळुंखे, राजू जवेरी, संदेश मदने, अजित शेरकर यांनी मोफत कामगार महिलांना साड्या आणि पुरुष कामगारांना रेनकोटचे वाटप केले. बारामतीच्या स्वच्छता करिता महिला आणि पुरुष कंत्राटी कामगार यांनी केलेल्या कामाचे कौतुक करून त्यांना कामाचे समाधान मिळावे या साठी जय जवान मंडळाने केलेला सत्कार कार्य यांचे कौतुक होत आहे,या वेळी फटाके फोडून कार्यकर्ते सदस्य यांनी आपला आनंद व्यक्त केला.



### चाकण शहराच्या सर्वांगीण विकासाला सहकार्य करु - सचिन अहिर

चाकण (दैनिक संध्या) : वाढती लोकसंख्या आणि विस्तारणारे चाकण यात दिवसेंदिवस मोठा बदल होत चालला असून, चाकण शहराच्या सर्वांगीण विकासासाठी जास्तीत जास्त निधी देऊ, असे आश्वासन विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी दिले. शिवसेना नेते अहिर यांची विधान परिषदेच्या उप सभापती पदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व चाकण नगरपरिषदेचे शिवसेनेचे गटनेते नितीन गोरे, जिल्हा उपप्रमुख प्रकाश वाडेकर व उद्योजक विशाल नायकवाडी यांच्या हस्ते अहिर यांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी अहिर यांनी वरील आश्वासन दिले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष शेखर घोगरे, नगरसेवक ॲड. प्रकाश गोरे, मंगेश कांडगे, रणजीत जरे, विशाल नायकवाडी, प्रीतम परदेशी, श्यामराव राक्षे, हर्षद लेंडघर, राहुल कांडगे, महेश शेवकरी, शशिकांत जाधव, संतोष लेंडघर, सुनील शेवकरी, सागर गोरे, साहेबराव कडुसकर, अनिल लोहकरे, निलेश गोरे, प्रेम जगताप आदी उपस्थित होते. उपसभापती सचिन अहिर यांनी यावेळी स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. सुरेशभाऊ यांच्यासारख्या व्यक्तिमत्वाची चाकणकरांना आज खऱ्या अर्थाने प्रचंड गरज होती. त्यांचा आदर्श व प्रेरणा घेऊन नगराध्यक्षा मनिषा गोरे व गटनेते नितीन गोरे हे चाकणच्या विकासाला गती देत आहेत, ही समाधानकारक बाब आहे, याबद्दल त्यांनी चाकण नगरपरिषदेच्या शिवसेनेच्या सर्व नगरसेवकांचे कौतुक केले.

### 'ज्ञानबा-तुकाराम'च्या जयघोषात इंदापुरात दिमाखदार अश्वरिंगण

इंदापूर (दैनिक संध्या) : "हेची व्हावी माझी आस... पंढरीचा वारकरी, वारी चुको नेदी हरी" या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील भक्तिभाव प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला तो इंदापुरातील दिमाखदार अश्वरिंगण सोहळ्यात. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या पालखीसोबत आलेल्या लाखो वैष्णवांच्या उपस्थितीत, 'ज्ञानबा-तुकाराम'च्या अखंड जयघोषात आणि मेघांच्या साक्षीने अश्वरिंगणाचा अविस्मरणीय सोहळा रंगला. रिंगण संपताच वरुणराजानेही हजेरी लावत भक्तिरसात चिंब भिजवले. प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही रयत शिक्षण संस्थेच्या मैदानावर रिंगण सोहळा पार पडला. सकाळी दहापासूनच भाविकांनी मैदानावर गर्दी केली होती. नियोजित वेळेपेक्षा काहीशी उशिराने निमगाव केतकी येथून संत तुकाराम महाराजांची पालखी श्रीराम वेशीत दाखल झाली. नगराध्यक्ष भरत शहा, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, प्रांताधिकारी उत्तम दिघे, तहसीलदार जीवन बनसोडे, भाजप नेते प्रदीप गारटकर, जिल्हा परिषद सदस्या अंकिता पाटील, माजी नगराध्यक्षा अंकिता शहा, सचिन खुडे, मुख्याधिकारी रमेश ढगे, महारुद्र पाटील, माउली चवरे, कैलास कदम, पोपट शिंदे, अनिकेत वाघ, स्वप्निल राऊत, विठ्ठल ननवरे आणि श्रीधर बाब्रस यांनी पालखीचे स्वागत केले. त्यानंतर नगराध्यक्ष भरत शहा यांच्या हस्ते पालखीची आरती करण्यात आली.



# १५ वर्षे प्रलंबित दिवाणी खटल्यात जुन्नरच्या तहसीलदारांविरुद्ध रु१० हजारांचे जामीनपात्र वॉरंट

जुन्नर (दै. संध्या)




न्यायालयीन समन्सकडे वारंवार दुर्लक्ष केल्याप्रकरणी जुन्नरच्या तहसीलदारा विरुद्ध, श्री.अनंत हिम्मतराव बाजड सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर जुन्नर यांनी पिराजी भाऊ फुलसुंदर विरुद्ध मस्जिद कब्रस्तान उर्फ इब्राहिम तांबोळी यांचे तब्बल १५ वर्षापासून प्रलंबित असलेल्या नियमित दिवाणी दावा क्र. १३९/२०१० या दाव्यात, दहा हजार रुपयांचे जामीनपात्र वॉरंट जारी करण्याचा महत्त्वपूर्ण आदेश पारित केला आहे.

या प्रकरणाच्या अंतिम सुनावणीसाठी तहसीलदारांची साक्ष महत्त्वाची असल्याने न्यायालयाने त्यांना यापूर्वी विधिवत समन्स बजावले होते. समन्सची सेवा झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीचे कारण देत तहसीलदारांनी एकदा मुदतवाढ मागितली होती. न्यायालयाने ती मंजूर करून दुसरी संधी दिली. मात्र त्यानंतरही निश्चित तारखेला ते न्यायालयात हजर राहिले नाहीत. तसेच गैरहजेरीबाबत कोणतेही अधिकृत पत्र किंवा स्पष्टीकरणही न्यायालयात सादर करण्यात आले नाही.

न्यायालयाने पारित केलेल्या आदेशात नमूद केले आहे की, केवळ आवश्यक साक्षीदाराच्या अनुपस्थितीमुळे १५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या दाव्याच्या अंतिम सुनावणीस विलंब होत आहे. त्यामुळे न्यायालयाचा मौल्यवान वेळ वाया जात असून न्यायदान प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होत आहे.दिवाणी प्रक्रिया संहितेतील आदेश १६ नियम १०(३) चा संदर्भ देत न्यायालयाने स्पष्ट केले की, समन्स बजावलेल्या प्रत्येक साक्षीदाराने न्यायालयात उपस्थित राहणे ही कायदेशीर जबाबदारी आहे. समन्सचे पालन न करणाऱ्या साक्षीदाराविरुद्ध अटक वॉरंट जारी करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे.

तहसीलदार हे सार्वजनिक सेवक असल्याने न्यायालयाने थेट अजामीनपात्र वॉरंट जारी करण्याऐवजी प्रथम दहा हजारांचे जामीनपात्र वॉरंट काढण्याचा निर्णय घेतला. या वॉरंटची अंमलबजावणी जुन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी करावी तसेच तहसीलदारांनी दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी न्यायालयात हजर राहून साक्ष द्यावी, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

या आदेशातून न्यायालयाने, सार्वजनिक अधिकारी असो किंवा सामान्य नागरिक, न्यायालयाने बजावलेल्या समन्सचे पालन करणे प्रत्येकासाठी समानपणे बंधनकारक असल्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. न्यायालयीन आदेशांकडे दुर्लक्ष करून खटल्यांच्या सुनावणीत विलंब करणाऱ्यांविरुद्ध आवश्यक ते कठोर पाऊल उचलण्यास न्यायालय मागेपुढे पाहणार नसल्याचेही या आदेशातून स्पष्ट झाले आहे.

कायदेतज्ज्ञांच्या मते, न्यायालयीन प्रक्रियेत साक्षीदारांची उपस्थिती अत्यंत महत्त्वाची असून, सार्वजनिक अधिकाऱ्यांनीही न्यायालयीन समन्सचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. जुन्नर न्यायालयाचा हा आदेश भविष्यात अशा स्वरूपाच्या प्रकरणांसाठी महत्त्वाचा न्यायालयीन संदर्भ ठरु शकतो.

## स्व.अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त जयेश कंद यांच्या वतीने विद्यार्थ्यांना छत्रीचे वाटप

कोरेगावमुळ (दै. संध्या)



स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणीकंद येथील सर्व विद्यार्थ्यांना पावसाळ्यात शाळेत ये-जा करताना दिलासा मिळावा या उद्देशाने छत्र्यांचे वाटप हवेली तालुका राष्ट्रवादी विध्यार्थी कॉग्रेसचे अध्यक्ष जयेश विलास कंद यांच्या वतीने करण्यात आले.

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी असंख्य कार्यकर्त्यांना ताकद देऊन राजकारण - समाजकारणामध्ये उभं केलं. हि सामाजिक जाणीव ठेवून आणि असंख्य कार्यकर्त्यांना दिलेले संस्कार आणि शिकवण आजही प्रेरणा देतात. समाजाने आपल्याला खूप काही दिले आहे, त्यामुळे आपणही समाजाला काहीतरी देणं लागतो याचं संकल्पनेतून साकारलेल्या एक छोटासा सेवाभावी उपक्रम हवेली तालुका राष्ट्रवादी विध्यार्थी कॉग्रेसचे अध्यक्ष जयेश विलास कंद यांच्या माध्यमातून संपन्न झाला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, कर्मचारी वर्ग, पालक, आजी माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वर्गीय अजित दादांच्या विचारांचा आणि सेवाभावी कार्याचा वारसा पुढे नेण्याचा आमचा संकल्प कायम राहील असे नमूद जयेश विलास कंद यांनी व्यक्त केले.

शिक्षणासाठी आवश्यक साहित्याबरोबरच पावसाळ्यातही विद्यार्थ्यांची शाळेकडे जाणारी पावले अखंड सुरु राहावीत, या भावनेतून हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. हेच विद्यार्थी उद्याच्या सक्षम आणि सुजाण शिल्पकार आहेत. त्यांच्या उज्वल भविष्यासाठी सातत्याने कार्यरत राहणे, शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देणे आणि त्यांच्या स्वप्नांना बळ देणे, ही जबाबदारी माझी आहे. समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी मिळावी, यासाठी भविष्यातही असे लोकाभिमुख उपक्रम सातत्याने राबवत राहणार आहे असे मत हवेली तालुका राष्ट्रवादी विध्यार्थी कॉग्रेसचे अध्यक्ष जयेश विलास कंद यांनी सांगितले.

## भिवडीतील हुतात्मा उमाजी नाईक हायस्कूलमध्ये गुणवंत व लोकप्रतिनिधींचा गौरव

जेजुरी (दै. संध्या)



हुतात्मा उमाजी नाईक हायस्कूल, भिवडी येथे विविध स्पर्धा व व्यावसायिक परीक्षांमध्ये यश मिळविणाऱ्या माजी विद्यार्थ्यांसह नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत विजयी झालेल्या लोकप्रतिनिधींचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. साहेबराव भिंताडे हे होते, तर अध्यक्षस्थानी श्रीदत्त शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शामकांत भिंताडे होते.

विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांपैकी एल.एल.बी. पदवी प्राप्त केलेले सुमित संदीप भिंताडे, एल.एल.बी. सीईटी परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळविणारी आकांक्षा पोपट जैनक, पोलीस दलात नियुक्ती झाल्याबद्दल राकेश संदीप औचरे, एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केलेले डॉ. अविनाश अनिल क्षिरसागर तसेच अभियांत्रिकी सीईटी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणारी समृद्धी भाऊ औचरे यांचाही विद्यालयाच्या वतीने गौरव करण्यात आला.

प्रमुख पाहुणे मा. साहेबराव भिंताडे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, "माणसाच्या मनात दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर तो आयुष्यात यशस्वी होतो. दिलेला शब्द पाळणारी व्यक्तीच समाजात मोठी ठरते. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवावी, कष्टाला कधीही कंटाळू नये. उद्याचा भविष्यकाळ तुमचाच आहे."

यावेळी सत्कारमूर्तींनी आपल्या यशाचा प्रवास सांगत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच पोलीस पाटील अक्षय शिंदे, प्रशांत वांढेकर, मनोहर क्षिरसागर, केशव आप्पा दिघे, सदाशिव दिघे, डॉ. मनोज शिंदे, हरिभाऊ लोळे, साहेबराव भिंताडे आणि शामकांत भिंताडे यांनीही समयोचित मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाला कॅप्टन ज्ञानोबा भिंताडे, पंढरीनाथ भिंताडे, महादेव दिघे, आप्पा खटाटे, विलास खटाटे, मनिषा भिंताडे, सुनिल भंडारे, सुनिल क्षिरसागर, सुनिल वांढेकर, लक्ष्मीबाई भिंताडे, प्रा. प्राजक्ता बोरकर, गिरीश भिंताडे, प्रणव जाधव, पृथ्वीराज भिंताडे, सत्कारार्थींचे नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जुन्नर पोलिसांची कारवाई: इनोव्हा कार, ३ किलो गांजा जप्त, एका आरोपीस अटक

जुन्नर (दै. संध्या)

जुन्नर शहरातील अहिल्याबाई होळकर शाळेच्या मैदानावर रात्रीच्या वेळी पोलिस गस्त घालत असताना संशयास्पद हालचाल दिसून आल्याने चौकशी करता इनोव्हा कारमध्ये ३किलो गांजा सापडला ,३आरोपी पळून जात असताना एका आरोपीस अटक करण्यात यश आले.

याबाबतची हकिकत अशी की, रविवारी पहाटे पावणे दोनच्या सुमारास पोलिस गस्त घालत असताना नगरपालिकेच्या अहिल्याबाई होळकर शाळेच्या मैदानावर संशयास्पद हालचाल दिसून आल्याने अधिक चौकशी करता तीन तरुण पळून जात असताना आरोपी मयूर संजय खराडे उर्फ सनी यास अटक केली . अन्य दोनजण फरार आहेत, फरार आरोपी निखिल परदेशी व असीम खलील कुरेशी आहेत पोलिसांनी पकडलेला आरोपी सनी उर्फ मयूर खराडे वय २७ यांच्याकडे अधिक चौकशी केली असता इनोव्हा गाडीत गांजा सापडला.आरोपी मयूर संजय खराडे वय -२७ रा -कल्याण पेठ, जुन्नर ता -जुन्नर, जि -पुणे ,असीम खलील कुरेशी रा -शुक्रवार पेठ, ता -जुन्नर जि -पुणे ,निखिल परदेशी (पूर्ण नाव माहित नाही )रा -प्ल्याटिनम हॉटेल चे बाजूला ता -जुन्नर, जि -पुणे आरोपी नं २ व ३ फरार आहेत.

हवालदार हांडे व डायल ११२ कामी पोलिस वाघमोडे, चालक सातपुते हे रात्रगस्त करत असताना पावणे दोनच्या सुमारास अहिल्यादेवी होळकर शाळेच्या मैदानात एक चार चाकी व एक दुचाकी वाहन त्यांचा पाठलाग करून त्यातील एका इसमाला पकडून त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव मयूर संजय खराडे (राहणार कल्याण पेठ जुन्नर )असे सांगितले त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याच्याकडे चार चाकी गाडीमध्ये गांजासारखा पदार्थ दिसला म्हणून पो हवा हांडे यांनी पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांना माहिती देऊन मदत मागितली .

त्यावेळी पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड व इतर स्टाफ फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दोन पंचासह रवाना झाले घटनास्थळी पोलीस निरीक्षक गुंड साहेब यांनी आरोपी मयूर खराडे यांना NDPD कायदा कलम ५० प्रमाणे नोटीस देऊन टोयोटा कंपनीची इनोव्हा गाडी नंबर MH12ET3911 ची झडती घेतली असता सदर गाडीमध्ये खाकी रंगाच्या चिकट टेपने गुंडाळलेले पाकीट मिळून आले त्यात गांजा सारखा उग्र वास येत असल्याने ते पाकीट ताब्यात घेतले तसेच बाजूला उभी असलेली एक्टिवा मोटरसायकल गाडी क्रमांकMH14CH6265 च्या हँडलला प्लॅस्टिकच्या पिशवीची पाहणी केली त्यात गांजासारखा उग्र वास येत असल्याने ती ताब्यात घेतली पंचायत समक्ष इलेक्ट्रिक काट्यावर त्याचे वजन केले असता त्याचे वजन 2.066 व 0.962 असे भरले म्हणून यातील आरोपी यांनी संगणमत करून सदरचे अमली पदार्थ गांजा अवैद्यरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने चार चाकी मध्ये व ॲक्टीव्हा मोटर सायकल मध्ये जवळ बाळगल्याच्या स्थितीत मिळून आल्याने सदर आरोपींविरुद्ध सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद दिली आहे. अधिक तपास पोलिस निरिक्षक दत्तात्रय गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरिक्षक संदीप मोरे तपास करत आहेत.

## चाकण बाजारात चक्राकार डांगर भोपळा, हिरवी मिरची, कांदा, बटाटा व चवळीची प्रचंड आवक

चाकण (दै. संध्या)



खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये चक्राकार डांगर भोपळा, हिरवी मिरची, कांदा, बटाटा व चवळीची प्रचंड आवक झाली. मेथी, कोथिंबीर व पालक भाजीचे भाव गडगडले आहेत. एकूण उलाढाल ६ कोटी १० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार ७०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ८०० ते २,२०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. बटाट्याचा कमाल भाव १,५०० रुपयांवरच स्थिरावला. लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. लसणाचा कमाल भाव १५ हजार रुपयांवरच स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३८५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ते ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा - एकूण आवक - १,७०० क्विंटल. भाव क्रमांक - १.२,२०० रुपये, भाव क्रमांक २. १,२०० रुपये, भाव क्रमांक ३. ८०० रू. बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल.भाव क्रमांक १.१,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये. फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ३३४ क्विंटल (१,००० ते २,००० रू.), कोबी - १९५ क्विंटल (१,००० ते १,६०० रू.), फ्लॉवर - २१० क्विंटल (१,००० ते २,००० रु.), वांगी - ८५ क्विंटल (२,५०० ते ४,००० रु.), भेंडी - ९६ क्विंटल (२,००० ते ५,००० रु.), दोडका - ६४ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), कारली - ६८ क्विंटल ( ३,००० ते ५,००० रु.), दुधीभोपळा - ५२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ११५ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), फरशी - ८ क्विंटल (६,००० ते ८,००० रु.), वालवड - २६ क्विंटल (६,००० ते ७,००० रुपये), ढोबळी मिरची - १५५ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), चवळी - ४२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), वाटाणा - ३० क्विंटल (१२,००० ते १६,००० रू. ), शेवगा - ३५ क्विंटल (५,००० ते ६,००० रु.), गाजर - १८० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गवार - ४८ क्विंटल (४,००० ते ६,००० रु. ), आले - १६० क्विंटल (१०,००० ते १५,००० रु. ).

## बस-आयशरच्या भीषण धडकेत ३२ जण जखमी; चौघांची प्रकृती गंभीर

खेड (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात रविवारी दुपारी १२ च्या सुमारास लग्नाचे वऱ्हाड घेऊन निघालेल्या खासगी बसचा सिमेंटच्या गोण्या वाहून नेणाऱ्या आयशर टेम्पोशी समोरासमोर भीषण अपघात झाला. कोये गावातील गोगावले वस्ती परिसरात घडलेल्या या दुर्घटनेत एकूण ३२ प्रवासी जखमी झाले असून त्यापैकी तीन ते चार जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. सुदैवाने या भीषण अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, वाशेरे (ता. खेड) येथून विवाह सोहळ्यासाठी वऱ्हाड घेऊन जाणारी खासगी बस शिरोली–पाईट मार्गाने जात होती. त्याचवेळी समोरून सिमेंटच्या गोण्या घेऊन येणाऱ्या आयशर टेम्पोशी बसची जोरदार धडक झाली. धडकेचा आवाज परिसरात घुमला आणि बसमधील अनेक प्रवासी जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जखमींना बसमधून बाहेर काढून प्रथम पाईट प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. जखमींची संख्या मोठी असल्याने कडूस व करंजविहिरे येथून अतिरिक्त रुग्णवाहिका मागविण्यात आल्या. गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी राजगुरूनगर, चांडोली आणि पिंपरी-चिंचवड येथील रुग्णालयांत हलविण्यात आले.

अपघातामुळे शिरोली–पाईट मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी संयुक्तपणे मदतकार्य राबवत वाहतूक सुरळीत केली. पाईट पोलीस चौकीचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## सच्चा गांधीवादी, समाजवादी सप्तर्षी निखळला

मुंबई (दैनिक संध्या) : ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, गांधीवादी नेते, लेखक आणि तरुण पिढीचे मार्गदर्शक डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनामुळे सच्चा गांधीवादी व समाजवादी 'सप्तर्षी' निखळला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, डॉ. सप्तर्षी यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील वंचित, शोषित घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि गांधीवादी विचारांच्या प्रसारासाठी समर्पित केले. युवक क्रांती दलाच्या (युक्रांद) माध्यमातून त्यांनी तरुणांमध्ये एक नवी ऊर्जा आणि सामाजिक जाणीव निर्माण केली. डॉ. सप्तर्षी हे अच्युतराव पटवर्धन एस. एम. जोशी, ना. ग. गोरे यांच्या समाजवादी परंपरेत वाढले. महात्मा गांधी आणि जयप्रकाश नारायण यांच्या विचारांचे ते आयुष्यभर कट्टर अनुयायी राहिले. विविध आंदोलनांमध्ये त्यांच्या सक्रिय सहभागाने त्यांना 'सत्याग्रही' म्हणून ओळख लाभली. डॉ. सप्तर्षी यांच्या लेखनाने आणि भाषणांनी अनेकांना प्रेरित केले. त्यांच्या सामाजिक बांधिलकी आणि साधेपणाने ते सर्वांचे आदर्श होते. लोकशाही मूल्यांचा आग्रह धरत असतानाच सामाजिक न्यायाच्या लढ्यातही ते कायम अग्रेसर असत. विधानपरिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी सभागृहात उमटवलेली छाप आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून रस्त्यावर केलेला संघर्ष कायम स्मरणात राहील. डॉ. सप्तर्षी यांच्या कुटुंबियांना, सहकाऱ्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## ऋषितुल्य व्यक्तिमत्व हरपले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई (दैनिक संध्या) : ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत, समाजप्रबोधक आणि परिवर्तनवादी चळवळीतील अग्रणी व्यक्तिमत्त्व डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाने सामाजिक बांधिलकीचा वारसा जपणारे ऋषितुल्य असे व्यक्तिमत्व आज आपल्यातून गेले अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. आपल्या शोकसंदेशात उपमुख्यमंत्री म्हणतात की, डॉ. कुमार सप्तर्षी यांनी आयुष्यभर समाजातील वंचित, दुर्बल आणि उपेक्षित घटकांच्या प्रश्नांसाठी निष्ठेने आवाज उठवला. गांधीवादी विचारसरणीच्या माध्यमातून सामाजिक समता, लोकशाही मूल्ये आणि मानवी संवेदनांचा आग्रह त्यांनी सातत्याने जपला. समाजाला विधायक दिशा देणाऱ्या त्यांच्या वैचारिक योगदानामुळे अनेक पिढ्यांतील युवक सामाजिक कार्याकडे प्रेरित झाले. ग्रामीण भागातील विकास, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक प्रबोधन आणि परिवर्तनवादी चळवळीला त्यांनी दिलेली बौद्धिक दिशा ही महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातील महत्त्वाची नोंद राहील. विचारांशी प्रामाणिक राहून समाजहितासाठी अखंड झटणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांसाठी प्रेरणादायी होते, असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणतात की, डॉ. सप्तर्षी यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक अभ्यासू विचारवंत, संवेदनशील समाजनेता आणि मूल्यनिष्ठ कार्यकर्ता गमावला आहे. त्यांचे कार्य, विचार आणि सामाजिक बांधिलकीचा वारसा पुढील पिढ्यांना सतत मार्गदर्शन करत राहील.

## इमर्जन्सी लोड सेडिंगमुळे मळ्यातील शेतकरी अंधारात

कळवण (दैनिक संध्या) : कळवण तालुक्यासह ग्रामीण भागातील कुंडाणे ओ सिरसमणी, जिरवाडे, भुसणी, नरुळ ओतूर, मेहदर, वडाळे, मुळाणे, आदी गावांतील मळ्यातील राहणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये महावितरण कंपनीच्या इमर्जन्सी लोड सेडिंगच्या धोरणाबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी शेतातील घरांसाठी नियमानुसार स्वतंत्र वीजमीटर घेतले असूनही इमर्जन्सी लोड सेटिंगमुळे रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. त्यामुळे शेतकरी कुटुंबांचे दैनंदिन जीवन अक्षरशः अंधारात जात असल्याचे चित्र आहे. दिवसभर शेतात कष्ट करून सायंकाळी घरी परतणाऱ्या शेतकऱ्यांना स्वयंपाक, जेवण आणि इतर आवश्यक कामे अंधारात करावी लागत असल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे मळ्यातील घरांमध्ये लहान मुले, वृद्ध आई-वडील आणि महिला राहत असल्याने रात्री वीज नसणे ही केवळ गैरसोय नसून गंभीर सुरक्षेची बाब असल्याचेही मत व्यक्त होत आहे.

# परिसंस्था निर्माण करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ पुणे (दै. संध्या)

क्वांटम कॉम्पुटिंग आणि डीप टेक टेक्नॉलॉजीने आज संपूर्ण जगामध्ये एक मोठी क्रांती घडवून आणली आहे. या तंत्रज्ञानाने केलेल्या अफाट वाढीशी, त्याच्या वेगाशी त्वरेने जुळवून घेणे आवश्यक आहे, त्यासाठी परिपूर्ण अशी इकोसिस्टिम (परिसंस्था) निर्माण करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे झालेल्या इंटर ॲक्शन वुईथ स्टेकहोल्डर्स फॉर फॉरमेशन ऑफ द ग्लोबल मॅन्युफॅक्चरींग हब ॲण्ड फ्रंटीयर टेक इन्स्टिट्यूट कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, महाराष्ट्र राज्य 'मित्रा' चे दीपक करंजीकर, ॲलिकॉन कॅस्टलॉयचे हर्ष गुणे, लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोळकर, ॲक्टीन टेक्नॉलॉजीचे विकास महाजन, बिग्रेडीयर सचिन कालिया, स्टॅटरजिक रिसर्च ॲण्ड ग्रोथ फाऊंडेशनचे वरुण खंदारे, सिम्बॉयसिसच्या प्र. कुलगुरु डॉ. स्वाती मुजूमदार, माजी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडिस्ट्रिज ॲण्ड ॲग्रीकल्चरचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत गिरबणे, इंडियन इस्टिट्यूट ऑफ सायन्स ॲण्ड रिसर्चचे प्रसन्नजित फडणवीस, पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, टाटा स्टिल लि. चे माजी उपाध्यक्ष सी. आर. कुलकर्णी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या तंत्रज्ञानाचा जागतिक स्तरावरील वाटा २०२४ मध्ये जवळपास २ ते ३ ट्रिलियन डॉलर्स होता, जो पुढील पाच वर्षांत सुमारे १६ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचेल. मानवी इतिहासात आपण यापूर्वी कधीही अशी गती आणि वाढ पाहिलेली नाही. त्यामुळे आपल्याला या विकासाच्या प्रवासाचा एक महत्त्वाचा भाग व्हावेच लागेल.

मुख्यमंत्री म्हणाले, संयुक्त राष्ट्रांच्या (United Nations) फ्रंटियर टेक्नॉलॉजी इंडेक्सकडे (Frontier Technology Index) पाहताना भारत यामध्ये चांगली कामगिरी करताना दिसत आहे. आपण सध्या ३६ व्या क्रमांकावर असलो, तरी आपली गणना अपेक्षेपेक्षा सरस कामगिरी करणारे म्हणून केली जात आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून आपण या क्षेत्रात उत्तम काम करत आहोत. या तंत्रज्ञानाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी आपण करत असलेले प्रयत्न सध्या विखुरलेले आणि वैयक्तिक पातळीवर अधिक केंद्रित असले, तरी आपण या प्रयत्नांचे संस्थात्मकीकरण केले, तर संपूर्ण चित्र बदलू शकते.

आज सिलिकॉन, एआय – कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्वाँटम कॉम्पुटिंग जग बदलून टाकणाऱ्या आहेत असे सांगून ते म्हणाले, आपल्या व्यवसायाचा प्रत्येक भाग या तीन गोष्टींमुळे सकारात्मक, नकारात्मक किंवा क्रांतिकारी पद्धतीने प्रभावित होणार आहे. त्यासाठी मजबूत इकोसिस्टीम (परिसंस्था) तयार करावी लागेल अन्यथा आपण काळाच्या ओघात मागे पडू. विशेषतः उत्पादन क्षेत्रात आपली सर्वात मोठी ताकद असणारे आपले एमएसएमई उद्योग निधीची कमतरता आणि क्षमतांसह इतर अनेक गोष्टींच्या अभावामुळे या तंत्रज्ञानाचा लाभ घेऊ शकत नाहीत. सर्वांगीण विकासासाठी इकोसिस्टीम तयार करायची असेल, तर सर्वांना सहज उपलब्ध असणारे स्मार्ट सुविधा आणि प्लॅटफॉर्म्स निर्माण करावे लागतील. आणि या स्मार्ट व्यवसायांच्या गरजा पूर्ण करू शकणारे सक्षम मनुष्यबळ तयार करावे लागेल.

महाराष्ट्राला जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनवण्यासाठी, या तंत्रज्ञानामध्ये आपल्याला मोठ्या प्रमाणावर सर्वसमावेशकता आणावी लागेल. त्यासाठी अशा विशिष्ट तंत्रज्ञानाला समर्पित असणारी संस्था उभारणे अत्यंत आवश्यक आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

केंद्र सरकारच्या क्वाँटम तंत्रज्ञानासंबंधीच्या योजना आधीच सुरू झाल्या असल्याचे सांगून आपण आपल्या प्रयत्नांना केंद्र सरकारच्या या उपक्रमांशी सुसंगत करणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्य शासनाला या तंत्रज्ञानामध्ये काम करणाऱ्या संस्थेची गरज तीव्रतेने जाणवत आहे. 'मित्रा' या दिशेने विचार करत आहे आणि काम करत आहे. स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि डीप टेकसाठी एक ठोस धोरणात्मक चौकट तयार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित येऊन धोरणांचे संस्थात्मक एकत्रिकरण करण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी व्यक्त केली. मुख्यमंत्री म्हणाले, अधिकाधिक लोकांना याचा लाभ घेता यावा यासाठी नवीन सुविधा आणि प्लॅटफॉर्म्सच्या बाबतीत शासन गुंतवणूक करण्यास पूर्णपणे तयार आहे. मित्रा'ने ठरवल्याप्रमाणे, आपल्याला क्वाँटम कम्प्युटिंगच्या प्रशिक्षकांचा एक मोठा गट तयार करायचा आहे, जे पुढे इतरांना प्रशिक्षित करतील. पुढील दोन तीन वर्षांत क्वाँटम कम्प्युटिंग क्षेत्रात किमान पाच हजार लोकांना प्रशिक्षित करण्याचे ध्येय असल्याचेही त्यांनी सांगितले.

सध्या वेगवेगळ्या पातळीवर होत असलेले हे सर्व प्रयत्न एकत्र आणून त्यांचे संस्थात्मकीकरण केले जाऊ शकते. त्या दृष्टीने इंटरॅक्शन विथ स्टेकहोल्डर्स फॉर फॉर्मेशन ऑफ द ग्लोबल मॅन्युफॅक्चरिंग हब अँड फ्रंटीयर टेक इन्स्टिट्यूट हा खरोखरच एक उत्तम उपक्रम आहे. मुंबईमध्ये विकसित होत असलेल्या 'इनोव्हेशन सिटी' साठी शासनाने टाटा समूहाशी भागीदारी केली असून ते सध्या या इनोव्हेशन सिटीचा संपूर्ण आराखडा तयार करत आहेत. एफटीआयचा हा उपक्रम इनोव्हेशन सिटीच्या संकल्पनेशी तंतोतंत जुळणारा आहे, त्यामुळे आपण यामध्येही एकत्र काम करू शकतो, असेही त्यांनी या विषयासाठी विविध क्षेत्रातील जमलेल्या तज्ञांशी बोलताना सांगितले. यावेळी उपस्थित तज्ज्ञांनी विविध क्षेत्रांमध्ये क्वाँटम तंत्रज्ञानाचा असलेला स्कोप याबद्दल चर्चा केली. हर्षवर्धन गुणे यांनी प्रास्ताविक केले, विकास महाजन यांनी आभार मानले.

# वारीतील सहभागातून जेमिनीने आपले नाते अधिक केले दृढ




■ अहिल्यानगर (दै. संध्या)

पंढरपूर वारीत सहभाग घेत जेमिनीने महाराष्ट्रातील स्थानिक समुदायांशी आपले नाते अधिक दृढ केले आहे आणि राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा सन्मान केला आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, पुण्याहून चार 'जेमिनी सेवा व्हॅन'ला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या व्हॅनमध्ये वारकऱ्यांसाठी मोबाईल चार्जिंगची सुविधा देण्यात आली असून, त्या पुण्यापासून पंढरपूरपर्यंत वारकऱ्यांसोबत प्रवास करतील. यामुळे भाविकांना त्यांच्या संपूर्ण यात्रेत आपल्या कुटुंबाशी संपर्कात राहणे सोयीचे होईल.

या यात्रेदरम्यान वारकऱ्यांना फराळ वाटप करणाऱ्या रेस्टॉरंट भागीदारांना कंपनीतर्फे 'जेमिनी शेंगदाणा तेल' (Gemini Groundnut Oil) पुरवले जाईल. याशिवाय, पावसाळ्यात मौल्यवान वस्तू सुरक्षित आणि कोरड्या ठेवण्यासाठी एक लाख पारदर्शक (ट्रान्सपरंट) युटिलिटी पाऊच, तसेच खिशात ठेवण्याजोगी 'पॉकेट आरती' आणि खास की-चेनचे वाटप केले जाईल, जे भाविकांसाठी यात्रेची एक उपयुक्त आठवण ठरेल.

या उपक्रमावर भाष्य करताना, सीनिअर डायरेक्टर, गो-टू-मार्केट रिटेल, कारगिल फूड साऊथ आशिया, शैलेश खुराणा म्हणाले: "अनेक दशकांपासून महाराष्ट्र हे जेमिनीचे घर राहिले आहे आणि गेल्या अनेक वर्षांत इथल्या घराघरांचा एक महत्त्वाचा भाग बनण्याचा बहुमान आम्हाला मिळाला आहे. पंढरपूरची वारी ही महाराष्ट्रातील सर्वात जिव्हाळ्याची परंपरा आहे, जी श्रद्धा, सेवा आणि सामाजिक एकतेचे उत्तम दर्शन घडवत लाखो भाविकांना एकत्र आणते. या वारीचा एक भाग होणे आणि पंढरपूरच्या वाटेवर भाविकांना मदत करणे हा आमचा सन्मान आहे. महाराष्ट्रातील जनता आणि समुदायांप्रती आमची बांधिलकी जपत, भाविकांचा हा प्रवास थोडा अधिक सुखकर करण्याची आमची इच्छा आहे. आमच्यासाठी, एक विश्वासार्ह ब्रँड असण्याचा अर्थ असाही आहे की ज्या क्षणांना मोठे सांस्कृतिक आणि भावनिक महत्त्व आहे, अशा प्रसंगी समाजासोबत खंबीरपणे उभे राहणे."

# सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रातील निस्वार्थ नेतृत्व हरपले – मुख्यमंत्री फडणवीस



■ ज्येष्ठ विचारवंत, गांधीवादी नेते डॉ. कुमार सप्तर्षी यांना मुख्यमंत्र्यांची श्रद्धांजली

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे निस्वार्थ नेतृत्व हरपले, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ विचारवंत, गांधीवादी नेते डॉ. कुमार सप्तर्षी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, डॉ. सप्तर्षी समाजाला दिशा देणारे विचारवंत, गांधीवादी कार्यकर्ते आणि परिवर्तनवादी चळवळीचे प्रेरणास्थान होते. ग्रामीण परिवर्तन, सामाजिक न्याय, लोकशाही मूल्यांचे संवर्धन आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि तरुणांच्या मनात परिवर्तनाची ज्योत प्रज्वलित करण्याचे मोठे कार्य केले. समाजातील अन्यायाविरुद्ध संघर्ष करताना त्यांनी नेहमीच सत्य, अहिंसा आणि लोकशाही मूल्यांचा आग्रह धरला. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने असंख्य कार्यकर्त्यांना सामाजिक बांधिलकीची प्रेरणा दिली.

डॉ. सप्तर्षी यांच्या निधनाने ग्रामीण विकास, शिक्षण, सामाजिक न्याय आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीची मोठी हानी झाली आहे. त्यांनी उभा केलेला वैचारिक वारसा आणि संघर्षाचा मार्ग पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. आम्ही डॉ . सप्तर्षी परिवारासह, त्यांच्या कार्यकर्त्यांच्या दुःखात सहभागी आहोत, असे नमूद करुन मुख्यमंत्र्यांनी ज्येष्ठ विचारवंत, गांधीवादी नेते डॉ कुमार सप्तर्षी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# कालव्याचे बेकायदेशीर खोदकाम!

■ जुन्नर (दै. संध्या)

पिंपळगाव जोगा धरणाच्या डाव्या कालव्यामध्ये विनापरवानगी खोदकाम करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आल्यानंतर पाटबंधारे विभागाने ओतूर ग्रामपंचायतीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधितांवर केवळ नोटीस देण्याऐवजी कठोर दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. जुन्नर तालुक्यात काही दिवसांपूर्वी सलग दोन ते तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे परिसरातील पाणी कालव्यात खोदकाम करून सोडण्यात आले.अशा परिस्थितीत कालव्यामध्ये कोणत्याही प्रकारचे विनापरवानगी खोदकाम करणे किंवा पाईप टाकणे अत्यंत धोकादायक मानले जाते. तज्ज्ञांच्या मते, कालव्यामध्ये अशा प्रकारचे अनधिकृत काम झाल्यास पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे निर्माण होऊ शकतात. परिणामी कालव्याच्या संरचनेवर ताण येऊन भविष्यात कालवा फुटण्यासारख्या गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वीही पिंपळगाव जोगा परिसरात कालवा फुटल्याची मोठी दुर्घटना घडली होती. त्या घटनेत शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली होती. उभी पिके, शेतीची माती आणि सिंचन व्यवस्था यांचे मोठे नुकसान झाले होते. त्या दुर्घटनेच्या आठवणी अद्याप ताज्या असताना पुन्हा अशा प्रकारचे विनापरवानगी खोदकाम झाल्याने शेतकऱ्यांमध्ये भीती आणि नाराजी वाढली आहे. दरम्यान, पाटबंधारे विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत ओतूर ग्रामपंचायतीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.



# खासदारांच्या आवाजाचे सॅम्पल घेतले जातील

■ कोणी कितीही मोठा असला तरी कारवाई होणार" पालकमंत्री जयकुमार गोरे

■ सोलापूर (दै. संध्या)

खासदारांच्या आवाजाचे सॅम्पल घेतले जातील; आणि कोणी कितीही मोठा असला तरी त्यांच्यावर कारवाई होईल"असे ठाम मत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी बोलून दाखवले.

खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या कथित व्हायरल कॉल रेकॉर्डिंग प्रकरणावर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पुन्हा एकदा भाष्य करत संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल, असे स्पष्ट केले. आवश्यक वाटल्यास खासदारांच्या आवाजाचे नमुने (व्हॉइस सॅम्पल) देखील घेतले जातील. तसेच, "कोणी कितीही मोठा असला तरी चौकशी करून दोषी आढळल्यास कारवाई केली जाईल," असा इशाराही त्यांनी दिला.

पत्रकारांशी संवाद साधताना जयकुमार गोरे म्हणाले की, संबंधित कॉल कोणाच्या फोनवरून आला, त्यामध्ये कोणती छेडछाड झाली आहे का, याची सखोल तपासणी केली जाईल. सध्या पोलिसांकडे अत्याधुनिक सायबर यंत्रणा उपलब्ध असून, तांत्रिकदृष्ट्या संपूर्ण प्रकरणाची पडताळणी केली जाईल. दरम्यान, खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि पंचायत समितीतील एका अधिकाऱ्यामधील कथित संभाषणाची ऑडिओ क्लिप काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना खासदार मोहिते पाटील यांनी तंत्रज्ञानाचा वापर करून ही ऑडिओ क्लिप तयार करण्यात आल्याचा दावा केला होता. याच दाव्यावर प्रतिक्रिया देताना पालकमंत्री गोरे म्हणाले की, तपासात सत्य समोर येईल. "जो दोषी नाही, त्याने स्पष्टीकरण देण्याची गरज नाही. मात्र, कोणीही कायद्यापेक्षा मोठा नाही. चौकशीअंती जे सत्य असेल त्यानुसार कारवाई केली जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले.



# बदनामी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

■ बिलोली (दै. संध्या)

राज्यातील ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाची सोशल मीडियाच्या माध्यमातून होत असलेली बदनामी थांबवून वादग्रस्त रविराज साबळे यांच्या विरुद्ध तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी ठाम मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन (डी.एन.ई.-136), जिल्हा शाखा नांदेड यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या एका व्हिडिओमध्ये राज्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी संवर्गावर अत्यंत बेजबाबदार, अपमानास्पद, अश्लील आणि बदनामीकारक स्वरूपाची वक्तव्ये करण्यात आली आहेत. कोणताही ठोस पुरावा न देता संपूर्ण ग्रामपंचायत यंत्रणेला भ्रष्ट ठरविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप युनियनने केला आहे. अशा प्रकारच्या विधानांमुळे राज्यभरातील हजारो प्रामाणिक ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या प्रतिमेला धक्का बसत असून समाजामध्ये शासन यंत्रणेबाबत अविश्वासाचे वातावरण निर्माण होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. युनियनच्या मते, ग्रामपंचायत अधिकारी हे ग्रामीण विकासाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणारे महत्त्वाचे घटक आहेत.



मात्र काही व्यक्तींकडून संपूर्ण संवर्गाला लक्ष्य करून केले जाणारे बेछूट आरोप, शिवीगाळ व बदनामीकारक भाषा ही केवळ अधिकाऱ्यांचा अपमान नसून शासनाच्या प्रशासन व्यवस्थेची प्रतिमाही मलिन करणारी आहे. या प्रकरणातील व्हिडिओची तसेच इतर डिजिटल पुराव्यांची तातडीने तपासणी करून रविराज साबळे यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच लागू असलेल्या माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून संबंधित बदनामीकारक व आक्षेपार्ह व्हिडिओ तात्काळ हटविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनने स्पष्ट केले आहे की, काही अपवादात्मक घटनांच्या आधारावर संपूर्ण अधिकारी वर्गाला बदनाम करणे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही. शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई केल्यास प्रशासनाविषयी नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल आणि भविष्यात अशा प्रकारच्या बेजबाबदार व बदनामीकारक कृत्यांना आळा बसेल, अशी अपेक्षा युनियनने व्यक्त केली आहे.यावेळी जिल्हाध्यक्ष अमृतराव शिंदे, सरचिटणीस धम्मानंद धोत्रे, कार्याध्यक्ष श्रीनिवास मुगावे,शेख नजीर,ग्रामविकास अधिकारी सुनील हाळदेवाड,पी डी वाघमारे, उत्तरवाड यांच्यासह युनियन च्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### रोटरी क्लब ऑफ पुणे सेंट्रलच्या अध्यक्षपदी कमोडोर परवीन मल्होत्रा

पुणे (दैनिक संध्या) : रोटरी क्लब ऑफ पुणे सेंट्रलच्या२०२६-२७या वर्षासाठी कमोडोर परवीन मल्होत्रा यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. पोचा हॉल, बोट क्लब येथे झालेल्या पदग्रहण समारंभात निवृत्त अध्यक्षा रोटेरियन लेखा नायर यांनी त्यांच्याकडे पदभार सुपूर्द केला. या वेळी माजी जिल्हा गव्हर्नर रोटेरियन डॉ.दीपक शिकारपूर प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर बोलताना कमोडोर मल्होत्रा यांनी "वारशाचा आधार, चिरस्थायी प्रभाव"("Building on Legacy, Creating Lasting Impact" ही वर्षाची संकल्पना जाहीर केली. जलसंधारण, शाळांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी, आर्थिक साक्षरता, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व सायबर सुरक्षा जनजागृती, "She Can and She Will" शी कॅन अँड शी विल उपक्रमाद्वारे महिला सक्षमीकरण, कुष्ठरोग पुनर्वसन तसेच रोटरी फाउंडेशनसाठी ३३ हजार अमेरिकी डॉलर्सचे योगदान ही यंदाच्या वर्षातील प्रमुख उद्दिष्टे असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी पुढील नवीन संचालक मंडळाचीही नियुक्ती करण्यात आली. कृष्ण कुमार श्रीनिवासन नियोजित अध्यक्ष, लेफ्टनंट कर्नल ज्युलियस रॉक मानद सचिव; आणि असीम श्रीवास्तव मानद खजिनदार. संजय करवा, रवी कपूर, जीवन महालदार, रेश्मा सांबरे, डॉ.सुनील देशमुख, प्रमोद के. भल्ला आणि वैशाली करवा. तसेच वर्षातील पहिला सेवा उपक्रम म्हणून थैलेसेमिया ग्रस्त बालकांसाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. द पूना क्लब, ससून रुग्णालय रक्तपेढी, केईएम रुग्णालय आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ SAII यांच्या सहकार्याने झालेल्या या उपक्रमात"टीम थैलेसेमिया" या जनजागृती अभियानाचाही शुभारंभ करण्यात आला.

### तुकोबांच्या पालखी सोहळ्यात वारकऱ्याचा मृत्यू झाल्यास एक लाखाची मदत


देहूगाव (दैनिक संध्या) : देहू ते पंढरपूर वारीच्या प्रवासात वारकऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने एक लाखाची मदत देण्यात येईल, असे पालखी सोहळाप्रमुख विक्रमसिंह मोरे यांनी शनिवारी जाहीर केले. मात्र यासाठी ती व्यक्ती तुकोबांच्या पालखी सोहळ्यात चालणारी असावी, दिंडी संस्थानकडे नोंदणीकृत असावी, असेही त्यांनी सांगितले. आषाढी वारीच्या प्रवासात जेजुरीजवळ झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याला ३४१ वर्षे झाली आहेत. सध्या पालखीमार्ग मोठे झाले असून, वाहनांची सोय झाली आहे. वारीमध्ये दिवसेंदिवस भाविकांची व वारकऱ्यांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे नियंत्रण ठेवताना व सोयीसुविधा पुरविताना शासकीय यंत्रणेवर मोठा ताण येतो. काही वेळेस वारीच्या वाटेवर अपघात घडतात, प्रकृती खालावते. त्यामुळे काही वारकऱ्यांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. काही वेळेस हृदयविकाराच्या धक्क्यासारख्या अनपेक्षित कारणामुळे निधन होऊ शकते. त्यामुळे वारीमध्ये जर एखाद्याचा मृत्यू झाला, तर त्याला मदत म्हणून माणुसकीच्या भावनेतून ही मदत केली जाणार आहे. मात्र ही मदत दुःखाची भरपाई नाही, तर संत तुकाराम महाराजांच्या सेवाभावातून आणि वारकरी कुटुंबाप्रती असलेल्या आपुलकीतून उचललेले छोटेसे पाऊल असल्याची भावना मोरे यांनी व्यक्त केली.

# मधुमेहींसाठी डोळ्यातील इंजेक्शनला पर्यायी उपचार

## अमेरिकेतील जागतिक नेत्रविज्ञान परिषदेत पुण्याच्या आयुर्वेदप्रेरित संशोधनाची दखल

पुणे (दै. संध्या)

मधुमेहामुळे होणाऱ्या डायबेटिक रेटिनोपॅथीच्या उपचारासाठी वारंवार डोळ्यात इंजेक्शन घेण्याची गरज कमी करू शकणाऱ्या आयुर्वेदप्रेरित उपचारपद्धती विकसित करण्यात आली आहे. या उपचारपद्धतीवरील संशोधनाची दखल अमेरिकेतील जगातील सर्वात मोठ्या नेत्रविज्ञान परिषदेत घेण्यात आली आहे. पुण्यातील रसायनी बायोलॉजिक्स यांनी विकसित केलेल्या 'तिमिरेक्स-आर' या नॅनोतंत्रज्ञानाधारित तोंडावाटे घेण्याच्या उपचारपद्धतीवरील संशोधनाची असोसिएशन फॉर रिसर्च इन व्हिजन अँड ऑप्थॅल्मोलॉजी (एआरव्हीओ) २०२६, या प्रतिष्ठेच्या परिषदेसाठी निवड झाली.




अमेरिकेतील डेन्व्हर येथे झालेल्या या परिषदेत जगभरातील सुमारे ११ हजार नेत्रतज्ज्ञ सहभागी झाले होते. भारताच्या पारंपरिक वैद्यकशास्त्राचे प्रतिनिधित्व करत या परिषदेत संशोधन सादर करणारे डॉ. योगेश बेंडाळे हे एकमेव संशोधक ठरले. हे संशोधन रसायु आयुर्वेद क्लिनिकमध्ये करण्यात आले असून, संशोधन पथकात डॉ. अविनाश कदम, डॉ. केतकी जगताप आणि डॉ. प्राजक्ता पोटे यांचा सहभाग होता. मधुमेहामुळे होणारा डायबेटिक रेटिनोपॅथी हा टाळता येण्याजोग्या अंधत्वामागील प्रमुख कारणांपैकी एक मानला जातो. भारतात १० कोटींहून अधिक नागरिक मधुमेहाने ग्रस्त असून, त्यातील अनेकांना पुढे डोळ्यांच्या गंभीर गुंतागुंतींचा सामना करावा लागतो. अशा रुग्णांना दृष्टी टिकवण्यासाठी वारंवार डोळ्यात इंजेक्शन घ्यावे लागते. मात्र या उपचारामुळे रुग्णांना वेदना, मानसिक ताण, वेळ आणि खर्चाचा मोठा भार सहन करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या अभ्यासात पूर्वी अनेक वेळा डोळ्यात इंजेक्शन घेऊनही अपेक्षित सुधारणा न झालेल्या रुग्णांचा समावेश करण्यात आला होता. ऑप्टिकल कोहेरन्स टोमोग्राफी तपासणीत उपचारानंतर रेटिनावरील सूज कमी झाल्याचे आणि डोळ्यांच्या रचनेत अनुकूल बदल झाल्याचे संशोधकांनी नमूद केले आहे.

संशोधनानुसार, निरीक्षण कालावधीत अशा सुमारे ९० टक्के रुग्णांना पुन्हा डोळ्यात इंजेक्शन घेण्याची गरज भासली नाही. तसेच उपचारादरम्यान कोणतेही गंभीर दुष्परिणाम आढळले नसल्याचा दावा संशोधनात करण्यात आला आहे. 'तिमिरेक्स-आर' या उपचारपद्धतीला अमेरिका तसेच इतर देशांमध्ये आंतरराष्ट्रीय पेटंट संरक्षणही मिळाले आहे.

याबाबत डॉ. योगेश बेंडाळे म्हणाले, "आयुर्वेद हे केवळ परंपरागत ज्ञान नसून आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर सिद्ध होऊ शकणारी उपचारव्यवस्था आहे. भारतात विकसित झालेले हे संशोधन भविष्यात मधुमेहामुळे दृष्टी गमावण्याच्या धोक्याशी सामना करणाऱ्या लाखो रुग्णांसाठी आशादायी ठरू शकते. नेत्रविज्ञान क्षेत्रातील सर्वोच्च वैज्ञानिक व्यासपीठ मानल्या जाणाऱ्या 'एआरव्हीओ' परिषदेत पुण्यातील या संशोधनाची झालेली निवड ही भारतीय आयुर्वेद, आधुनिक विज्ञान आणि स्वदेशी संशोधन क्षमतेला मिळालेली महत्त्वाची आंतरराष्ट्रीय मान्यता आहे."

# सासवडच्या अजय मंडळाकडून विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

सासवड (दै. संध्या)



सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या सासवड शहरातील अजय सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि अध्यक्ष प्रवीण पवार व मित्र परिवाराच्या वतीने नुकताच सन्मान पुरस्कार व बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात सासवड नगरपालिकेचे सफाई व पाणीपुरवठा कर्मचारी, तसेच सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, कला व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यासोबतच पुरंदर तालुक्यातील विविध शाळांमधील चित्रकला व रांगोळी स्पर्धा विजेत्या विद्यार्थ्यांचा आणि तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. बंदरवाला कुष्ठरोग रुग्णालय, पुरंदर मेडिकल असोसिएशन, पुरंदर केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन, मासूम महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ, म.ए.सो. वाघेरे विद्यालय, पुरंदर हायस्कूल सासवड, आदर्श ग्रामपंचायत आडाचीवाडी, रोटरी क्लब ऑफ पुरंदर, संदीप इनामके (चित्रपट कलादिग्दर्शक), सोमनाथ भोंगळे (चित्रकार) आणि राजेंद्र हनुमंत वाबळे (सामाजिक कार्यकर्ते) यांना सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास पुरंदरचे माजी आमदार अशोक टेकवडे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धनी जगताप, जिल्हा परिषद सदस्य हरिभाऊ लोले, अजय इंगळे, राष्ट्रवादीचे विधानसभा अध्यक्ष वामन जगताप, नगरसेवक राजन जगताप, मयूर चौखंडे, बाळासो भिंताडे, नंदकुमार जगताप, डॉ. सुभाष शिवतारे, प्रा. राजेश काकडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अजय सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष माजी नगरसेवक प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कार्यकर्त्यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय काटकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन राजेंद्र जगताप यांनी केले.

# वास्तुरचनाकारांनी नवतंत्रज्ञानासह प्रयोगशील व सर्जनशील वृत्ती अंगीकारावी : आर्कि. अजय सोनार

पुणे (दै. संध्या)

"बदलत्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी भावी वास्तुरचनाकारांनी नवतंत्रज्ञानाची सांगड सर्जनशीलता, संशोधन आणि प्रयोगशीलतेशी घालणे आवश्यक आहे. समाजाभिमुख, पर्यावरणपूरक आणि शाश्वत वास्तुरचना हीच काळाची गरज असून, विद्यार्थ्यांनी केवळ इमारतींची रचना न करता लोकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडविणारी दृष्टी विकसित करावी," असे प्रतिपादन प्रसिद्ध वास्तुविशारद तथा 'ए फॉर आर्किटेक्चर'चे सहसंस्थापक आर्कि. अजय सोनार यांनी केले.



सतीश मिसाळ एज्युकेशनल फाउंडेशनच्या ब्रिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे आयोजित 'ब्रिक १२ ऑन १२' या प्रदर्शनावेळी सोनार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उपक्रमाचे हे आठवे वर्ष होते. आघारकर रस्त्यावरील सारथी संस्थेच्या सभागृहात आयोजित या दोन दिवसीय उपक्रमात १२ निवडक विद्यार्थ्यांनी प्रत्येकी १२ मिनिटांत आपल्या वास्तुकलेशी संबंधित संशोधन, संकल्पना आणि डिझाइन सादर केले. यासोबतच वार्षिक प्रदर्शन, माजी विद्यार्थ्यांचा मेळावा, तज्ज्ञांची व्याख्याने आणि परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध डिझाइन संकल्पना, संशोधन प्रकल्प आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचे प्रदर्शन उपस्थितांनी पाहिले. वास्तुकला क्षेत्रातील तज्ज्ञ, माजी विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत करिअरच्या संधी, आधुनिक तंत्रज्ञान आणि उद्योगातील बदलत्या अपेक्षांविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधनवृत्तीला आणि व्यावसायिक तयारीला चालना देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमावेळी प्रख्यात वास्तुरचनाकार आर्कि. राजीव विश्वासराव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रावसाहेब लटपटे, संस्थेच्या संस्थापक संचालिका डॉ. पूजा मिसाळ, प्राचार्या डॉ. पूर्वा केसकर, उपप्राचार्या आर्कि. मनाली देशमुख, आर्कि. अभंग कांबळे, आर्कि. नलिनी निंबाळकर, आर्कि. मयुरेश शिरोळकर, डॉ. वैदेही लवांड, डॉ. श्रद्धा माहोरे-मांजरेकर, डॉ. सुधीर देशपांडे, आर्कि. अक्षय गांधी, आर्कि. इरावती नाथ यांच्यासह वास्तुरचना क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

आर्कि. राजीव विश्वासराव यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक जगातील अनुभव सांगत वास्तुकलेत तांत्रिक कौशल्याबरोबरच सामाजिक जबाबदारी, स्थानिक गरजांची जाण आणि सातत्याने शिकण्याची वृत्ती महत्त्वाची असल्याचे सांगितले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रावसाहेब लटपटे यांनी संशोधनाधारित शिक्षण, नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि बहुआयामी विचारसरणी यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. 'बियॉंड डिझाईन: द स्ट्रॅटेजी बिहाइंड सक्सेसफुल प्रोजेक्ट्स' या विषयावरील चर्चासत्रात आर्कि. विजय साने, आर्कि. अदिती वाटवे, आर्कि. रोहित सरदेसाई, आर्कि. कनिका अग्रवाल यांनी विचार मांडले.


संस्थेच्या संस्थापक संचालिका डॉ. पूजा मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांसमोर आपले विचार मांडण्याची संधी उपलब्ध करून देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि व्यावसायिक जगासाठी सक्षम बनविणे हा 'ब्रिक १२ ऑन १२' उपक्रमाचा उद्देश असल्याचे सांगितले. डॉ. पूर्वा केसकर यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सादरीकरण कौशल्य, संशोधनवृत्ती आणि व्यावसायिक दृष्टी विकसित होत असल्याचे नमूद केले.

# सेवा भवन प्रकल्पाला आवश्यक साहाय्य निश्चितपणे करू - महापौर

पुणे (दै. संध्या)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीतर्फे सेवा भवन येथे चालवले जाणारे सेवेचे उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असून या प्रकल्पाला आवश्यक असणारे सर्व साहाय्य आम्ही निश्चितपणे करू, असे मनोगत महापौर मंजुषा नागपुरे यांनी व्यक्त केले.

महापौर मंजुषा नागपुरे, महापालिकेतील गटनेता गणेश बीडकर आणि भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी सेवा भवन प्रकल्पाला भेट देऊन संपूर्ण प्रकल्पाची पाहणी केली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात महापौर बोलत होत्या. महापौर नागपुरे यांनी सेवा भवन प्रकल्पातील डायलिसीस सेंटरची पाहणी केली आणि डायलिसीस सेंटरचे काम समजून घेतले. विविध सेवाकार्यांचीही माहिती त्यांनी करून घेतली.



डॉ. राजन पंडित आणि डॉ. अजय उपाध्ये यांनी डायलिसीस सेंटरची माहिती महापौरांना आणि महापालिका पदाधिकाऱ्यांना दिली. नगरसेवक पुनीत जोशी, सुनील पांडे, मंजुश्री खर्डेकर, ॲड. मिताली सावळेकर यांचीही यावेळी उपस्थिती होती.

जनकल्याण समितीचे महाराष्ट्र प्रांत कार्यवाह राजन गोऱ्हे, सहकार्यवाह मुकुल पाटगांवकर यांनी पदाधिकाऱ्यांचा सन्मान केला आणि जनकल्याण समितीचे तसेच संघाचे वाङ्मय भेट दिले. सेवा भवन प्रकल्पाच्या अध्यक्षा डॉ. स्वाती बेलसरे आणि संघटनमंत्री पराग कंगले यांनी जनकल्याण समितीचे कार्य तसेच प्रकल्पाची माहिती दिली. संघाचे पुणे महानगर कार्यवाह सचिन भोसले, महानगर प्रचारक रोहित रिसबुड यावेळी उपस्थित होते.

# स्व. अजितदादांच्या जयंतीनिमित्त महारक्तदान शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद

## एक हजारांहून अधिक रक्तदात्यांनी केले रक्तदान; समाजसेवेच्या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक

बारामती (दै. संध्या)

दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बारामती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शारदा प्रांगण येथे आयोजित करण्यात आलेल्या महारक्तदान शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये एक हजारांहून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी अधोरेखित केली. ज्येष्ठ नागरिक, युवक,युवती, विद्यार्थी,विद्यार्थिनी तसेच महिला भगिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत हा उपक्रम यशस्वी केला.




शिबिराच्या प्रारंभापासूनच रक्तदात्यांची मोठी गर्दी झाली होती.गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे,या उदात्त भावनेतून अनेकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले.यावेळी प्रथमच रक्तदान करणाऱ्या युवक-युवतींची संख्या लक्षणीय होती.महिलांचाही सहभाग उल्लेखनीय राहिल्याने संपूर्ण परिसर समाजसेवेच्या वातावरणाने भारावून गेला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते जयदादा पवार, पुणे जिल्हाध्यक्ष संभाजी होळकर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोळेकर, नगराध्यक्ष सचिन सातव, ज्येष्ठ नगरसेवक किरण गुजर, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुशील सोमानी, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, माजी पुणे जिल्हाध्यक्ष विश्वासराव देवकाते, माजी नगराध्यक्ष सुभाष सोमानी, प्रसिद्ध व्यापारी किशोर सराफ, माजी नगराध्यक्षा भारती मुथा, दूध संघाचे चेअरमन किशोर फडतरे, तालुकाध्यक्ष संदीप बांदल यांच्यासह आजी-माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष,सर्व नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक, विविध सामाजिक संस्था, वैद्यकीय पथक आणि विविध रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याचे स्वागत करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ॲड.किरण इंगळे यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व रक्तदाते, स्वयंसेवक,सामाजिक संस्था, वैद्यकीय पथक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.समाजहिताचे असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्यात येतील,अशी ग्वाही त्यांनी दिली.

स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या महारक्तदान शिबिरातून समाजसेवेचा आणि मानवतेचा संदेश देण्यात आला. एक हजारांहून अधिक रक्तदात्यांनी केलेल्या रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार असून,या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### महिनाभर सामाजिक उपक्रमांची मालिका

दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार,खासदार पार्थ पवार आणि युवा नेते जय पवार यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेने बारामतीमध्ये महिनाभर विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.महारक्तदान शिबिर हा त्यातील प्रमुख उपक्रम ठरला. नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा स्व.अजितदादा पवार यांच्या समाजसेवेच्या विचारांवरील विश्वासाचे प्रतीक आहे.पक्षाचे वतीने अकरा हजार वृक्षांचे वाटप करण्यात येणार असून आगामी काळातही अशाच समाजोपयोगी उपक्रमांची मालिका राबविण्यात येणार असल्याची माहिती शहराध्यक्ष ॲड.किरण इंगळे यांनी दिली.

— ॲड.किरण इंगळे, शहराध्यक्ष, बारामती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

# चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष पदाची मंगळवारी होणार निवड

चाकण (दै. संध्या)

चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सुवर्णा शामराव राक्षे यांनी आपल्या पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने इतरांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी म्हणून स्वखुशीने राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या या पदासाठी चाकण येथे मंगळवारी (दि.२१ जुलै ) उपनगराध्यक्ष पदाची निवड होणार आहे.

चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी सुवर्णा राक्षे यांचा उपनगराध्यक्ष पदाचा राजीनामा स्वीकारला आहे. राक्षे यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले आहे. त्यामुळे या पदासाठी चाकण नगरपरिषदेच्या वतीने निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज वरील नियोजित दिवशी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळात दाखल करावयाचे आहेत. त्यानंतर एक वाजता छाननी, माघार आणि दुपारी दोन वाजता या पदाची निवड होताच विजयी उमेदवार जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा तथा पिठासिन अधिकारी मनिषा गोरे व गटनेते नितीन गोरे यांनी दिली. उपनगराध्यक्षपदी कोणाला संधी मिळणार, याकडे चाकणकरांचे लक्ष लागले आहे. चाकण नगरपरिषदेवर शिवसेना शिंदे गटाचे वर्चस्व असून, खेडचे माजी आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे यांच्या पत्नी मनीषा गोरे ह्या चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आहेत. चाकण नगरपरिषद अस्तित्वात आल्यानंतर दुसऱ्यांदा पंचवार्षिक निवडणूक होऊन चाकण नगरपरिषदेवर जानेवारी महिन्यात नव्याने कार्यकारी मंडळ अस्तित्वात आले. उपनगराध्यक्षपद आपल्याकडे खेचून आणण्यासाठी इच्छुकांच्या हलचालीला वेग आला आहे. इच्छुकांनी या पदासाठी वरिष्ठांकडे जोरदार फिल्डिंग लावली असून, या पदावर कोण विराजमान होणार, कोणाला संधी मिळणार, याकडे चाकणकरांचे लक्ष लागले आहे.